# वर्तमान तीर्थंकर
# श्री सीमंधर स्वामी




Marathi

दादा भगवान कथित

# वर्तमान तीर्थंकर श्री सीमंधर स्वामी

मूळ गुजराती संकलन : डॉ. नीरूबहन अमीन
अनुवाद : महात्मागण

**प्रकाशक** : अजीत सी. पटेल
दादा भगवान विज्ञान फाउंडेशन
1, वरूण अपार्टमेंट, 37, श्रीमाळी सोसायटी,
नवरंगपुरा पुलिस स्टेशनच्या समोर,
नवरंगपुरा, अहमदाबाद - 380009,
Gujarat, India.
**फोन :** +91 79 3500 2100

© Dada Bhagwan Foundation,
5, Mamta Park Society, B\h. Navgujarat College,
Usmanpura, Ahmedabad - 380014, Gujarat, India.
**Email :** info@dadabhagwan.org
**Tel :** + 91 79 3500 2100

**All Rights Reserved. No part of this publication may be shared, copied, translated or reproduced in any form (including electronic storage or audio recording) without written permission from the holder of the copyright. This publication is licensed for your personal use only.**

**प्रथम आवृत्ति** : 3000, ऑक्टोबर, 2016

**भाव मूल्य** : 'परम विनय' आणि
'मी काहीच जाणत नाही', हा भाव!

**द्रव्य मूल्य** : 10 रुपये

**मुद्रक** : अंबा मल्टीप्रिंट
B-99, इलेक्ट्रॉनिक्स GIDC,
क-6 रोड, सेक्टर-25,
गांधीनगर-382044.
Gujarat, India.
**फोन :** +91 79 3500 2142

**ISBN/eISBN** : 978-93-86321-06-0

Printed in India

## त्रिमंत्र





नमो अरिहंताणं

नमो सिद्धाणं

नमो आयरियाणं

नमो ऊवज्झायाणं

नमो लोए सव्वसाहूणं

एसो पंच नमुक्कारो

सव्व पावप्पणासणो

मंगलाणं च सव्वेसिं

पढमं हवइ मंगलं ॥ १ ॥

ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥ २ ॥

ॐ नमः शिवाय ॥ ३ ॥

जय सच्चिदानंद





# दादा भगवान कोण?

जून १९५८ संध्याकाळची अंदाजे सहाची वेळ, सुरत स्टेशनवर अलोट गर्दी होती. रेल्वेच्या प्लेटफॉर्म नंबर तीनच्या बाकावर बसलेल्या श्री अंबालाल मूळजीभाई पटेल रूपी देहमंदिरात नैसर्गिक स्वरूपात कित्येक जन्मांपासून व्यक्त होण्यासाठी आतूर असलेले 'दादा भगवान' संपूर्णपणे प्रकट झाले आणि निसर्गाने सर्जन केले अध्यात्माचे अद्‌भुत आश्चर्य! एका तासात विश्वदर्शन लाभले! मी कोण? भगवंत कोण? जग कोण चालवत आहे? कर्म म्हणजे काय? मुक्ती कशाला म्हणतात? इत्यादी जगातील सर्व आध्यात्मिक प्रश्नांची रहस्ये संपूर्णपणे प्रकट झाली. अशाप्रकारे निसर्गाने विश्वाला प्रदान केले एक अद्वितीय, संपूर्ण दर्शन आणि ह्याचे माध्यम बनले अंबालाल मूळजीभाई पटेल, जे होते गुजरातच्या चरोतर जिल्ह्यातील भादरण गावचे पाटील, कॉन्ट्रॅक्टचा व्यवसाय करणारे आणि तरीही पूर्ण वीतराग पुरुष.

त्यांना प्राप्ती झाली तशी ते फक्त दोन तासात इतर मुमुक्षूंना सुद्धा आत्मज्ञानाची प्राप्ती करवित असत, त्यांच्या सिद्ध झालेल्या अद्‌भुत ज्ञान प्रयोगाद्वारे. त्याला अक्रम (क्रमविरहीत) मार्ग म्हटले जाते. अक्रम म्हणजे क्रमाशिवायचा आणि क्रम म्हणजे पायरी पायरीने, क्रमाक्रमाने वर चढणे! अक्रम म्हणजे लिफ्ट मार्ग! शॉर्ट कट!

ते स्वतः प्रत्येकाला 'दादा भगवान कोण?' याबद्दलची फोड करून देताना म्हणायचे की, ''हे दिसतात ते 'दादा भगवान' नाहीत. हे तर 'ए.एम. पटेल' आहेत. आम्ही ज्ञानी पुरुष आहोत आणि आत प्रकट झाले ते दादा भगवान आहेत. दादा भगवान तर 'चौदालोक'चे नाथ आहेत, ते तुमच्यात पण आहेत, सर्वांमध्ये आहेत! तुमच्यात अव्यक्त रुपात आहेत आणि 'येथे' माझ्या आत संपूर्णपणे व्यक्त झालेले आहेत! माझ्या आत प्रकट झालेले 'दादा भगवान' यांना मी पण नमस्कार करतो.''

व्यापारात धर्म असावा परंतु धर्मात व्यापार नसावा. या सिद्धांताने त्यांनी आपले संपूर्ण जीवन व्यतीत केले. संपूर्ण जीवनात त्यांनी कधीही, कोणाकडूनही पैसे घेतले नाहीत, उलट स्वतःच्या व्यवसायातून झालेल्या फायद्यातून भक्तांना यात्रा करवित असत.

# निवेदन

ज्ञानी पुरुष संपूज्य दादा भगवान यांच्या श्रीमुखातून अध्यात्म आणि व्यवहारज्ञानासंबंधित जी वाणी निघाली, तिला रेकॉर्ड करून संकलन व संपादन करून पुस्तकाच्या रूपाने प्रकाशित केले जात आहे. विभिन्न विषयांवर निघालेल्या सरस्वतीचे अद्भुत संकलन ह्या पुस्तकात झाले आहे, जे नवीन वाचकांसाठी वरदान रूप सिद्ध होईल.

प्रस्तुत अनुवादामध्ये असे विशेष ध्यान ठेवलेले आहे की प्रत्येक वाचकाला दादाश्रींची प्रत्यक्ष वाणीच ऐकली जात आहे असा अनुभव व्हावा. याच कारणाने कदाचित काही ठिकाणी अनुवादाची वाक्य रचना मराठी व्याकरणानुसार त्रुटीपूर्ण जाणवेल, परंतु तिथे जर आशय समजून वाचण्यात आले तर अधिक लाभदायी होईल.

प्रस्तुत पुस्तकात काही ठिकाणी कंसात दर्शविलेले शब्द किंवा वाक्य दादाश्रींद्वारा बोलल्या गेलेल्या वाक्यांना अधिक स्पष्टतापूर्वक समजावण्यासाठी लिहिले गेले आहेत. तसेच काही ठिकाणी इंग्रजी शब्दांना मराठी अर्थाच्या रूपात ठेवले गेले आहेत. दादाश्रींच्या श्रीमुखातून निघालेले काही शब्द जसेच्या तसेच *इटालिक्स* मध्ये ठेवलेले आहेत, कारण त्या शब्दांसाठी मराठी भाषेत असे शब्द नाहीत की जे त्याचा पूर्ण अर्थ देऊ शकतील. तरी पण त्या शब्दांचे समानर्थी शब्द कंसात तसेच पुस्तकाच्या शेवटी पण दिले गेले आहेत.

ज्ञानींच्या वाणीला मराठी भाषेत यथार्थ रूपाने अनुवादित करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु दादाश्रींच्या आत्मज्ञानाचा आशय जसा आहे तसा तर आपल्याला गुजराती भाषेतच अवगत होईल. ज्यांना ज्ञानाचा गहन अर्थ समजून घ्यायचा असेल, ज्ञानाचे खरे मर्म समजायचे असेल त्यांनी ह्या हेतूने गुजराती भाषा शिकावी असा आमचा अनुरोध आहे. अनुवादासंबंधी उणीवांबद्दल आपले क्षमा प्रार्थी आहोत.

❖ ❖ ❖ ❖ ❖

# दादा भगवान फाउन्डेशनची प्रकाशित मराठी पुस्तकें

1. भोगतो त्याची चूक
2. एडजस्ट एवरीव्हेर
3. जे घडले तोच न्याय
4. संघर्ष टाळा
5. मी कोण आहे ?
6. क्रोध
7. चिंता
8. प्रतिक्रमण (सं)
9. भावना सुधारे जन्मोजन्म
10. कर्माचे विज्ञान
11. पाप-पुण्य
12. आई-वडील आणि मुलांचा व्यवहार (सं)
13. पति-पत्नीचा दिव्य व्यवहार (सं)
14. समजपूर्वक प्राप्त ब्रह्मचर्य (सं)
15. मानव धर्म
16. मृत्युवेळी, आधी आणि नंतर
17. सेवा-परोपकार
18. दान
19. त्रिमंत्र
20. वर्तमान तीर्थंकर श्री सीमंधर स्वामी
21. चमत्कार
22. सत्य-असत्याचे रहस्य
23. वाणी, व्यवहारात (सं)
24. पैशांचा व्यवहार (सं)
25. क्लेश रहित जीवन
26. निजदोष दर्शनाने... निर्दोष!
27. प्रेम
28. गुरू-शिष्य
29. अहिंसा
30. आप्तवाणी-1, 2, 3

# हिन्दी

1. आत्मसाक्षात्कार
2. ज्ञानी पुरुष की पहचान
3. सर्व दु:खों से मुक्ति
4. कर्म का सिद्धांत
5. आत्मबोध
6. मैं कौन हूँ ?
7. पाप-पुण्य
8. भुगते उसी की भूल
9. एडजस्ट एवरीव्हेयर
10. टकराव टालिए
11. हुआ सो न्याय
12. चिंता
13. क्रोध
14. प्रतिक्रमण (सं, ग्रं)
16. दादा भगवान कौन ?
17. पैसों का व्यवहार (सं, ग्रं)
19. अंत:करण का स्वरूप
20. जगत कर्ता कौन ?
21. त्रिमंत्र
22. भावना से सुधरे जन्मोंजन्म
23. चमत्कार
24. प्रेम
25. समझ से प्राप्त ब्रह्मचर्य (सं, पू, उ)
28. दान
29. मानव धर्म
30. सेवा-परोपकार
31. मृत्यु समय, पहले और पश्चात्
32. निजदोष दर्शन से... निर्दोष
33. पति-पत्नी का दिव्य व्यवहार (सं)
34. क्लेश रहित जीवन
35. गुरु-शिष्य
36. अहिंसा
37. सत्य-असत्य के रहस्य
38. वर्तमान तीर्थकर श्री सीमंधर स्वामी
39. माता-पिता और बच्चों का व्यवहार (सं)
40. वाणी, व्यवहार में... (सं)
41. कर्म का विज्ञान
42. सहजता
43. आप्तवाणी - 1 से 9
52. आप्तवाणी - 13 (पूर्वार्ध व उत्तरार्ध)
54. आप्तवाणी - 14 (भाग-1, 2)
56. ज्ञानी पुरुष (भाग-1)

**( सं - संक्षिप्त, ग्रं - ग्रंथ, पू - पूर्वार्ध, उ - उत्तरार्ध )**

★ **दादा भगवान फाउन्डेशन द्वारे गुजराती आणि इंग्रजी भाषेत सुद्धा बरीच पुस्तके प्रकाशित झाली आहे। वेबसाइट www.dadabhagwan.org वर सुद्धा आपण ही सगळी पुस्तके प्राप्त करू शकता।**

★ **प्रत्येक महिन्यात हिन्दी, गुजराती आणि अंग्रेजी भाषेत दादावाणी मेगेझीन प्रकाशित करीत आहे।**

# संपादकीय

मोक्ष प्राप्त करण्याची इच्छा कोणाला नसते? पण मोक्ष प्राप्त करण्याचा मार्ग सापडणे कठीण आहे. मोक्षमार्गाच्या दात्याशिवाय त्या मार्गावर कोण घेऊन जाईल?

पूर्वी सुद्धा कित्येक ज्ञानी पुरुष आणि तीर्थंकर होऊन गेले आहेत आणि त्यांनी कितीतरी लोकांना मोक्षाचे ध्येय सिद्ध करवून दिले आहे. वर्तमानात तरणतारण ज्ञानी पुरुष 'दादाश्रीं' मार्फत हा मार्ग मोकळा झाला आहे, अक्रम मार्गाच्या माध्यमाने! क्रमाक्रमाने पायऱ्या चढणे आणि अक्रम मार्गाने लिफ्टने चढणे यात कोणता मार्ग सोपा आहे? पायऱ्या की लिफ्ट? या काळात तर सर्वांना लिफ्टच परवडेल ना!

'या काळात या क्षेत्रातून सरळ मोक्ष प्राप्ती शक्य नाही' असे शास्त्रात सांगितले आहे. परंतु व्हाया महाविदेह क्षेत्र, श्री सीमंधर स्वामींच्या दर्शनाने मोक्षप्राप्तीचा मार्ग तर दीर्घकाळापासून मोकळाच आहे ना! संपूज्य दादाश्री त्याच मार्गाने मुमुक्षूंना मोक्षाला पोहोचवितात. आणि मुमुक्षूंना ह्या मोक्षप्राप्तीची खात्री निश्चयाने होत असते.

या काळात या क्षेत्रात तीर्थंकर नाहीत, पण या काळात महाविदेह क्षेत्रात वर्तमान तीर्थंकर श्री सीमंधर स्वामी भगवंत विराजमान आहेत, आणि ते भरत क्षेत्रातील मोक्षार्थी जीवांना मोक्ष प्राप्त करवून देतात. ज्ञानीपुरुष स्वत: त्या मार्गाने प्राप्ती करून इतरांना तो मार्ग दाखवितात.

प्रत्यक्ष-प्रकट तीर्थंकरांची ओळख होणे, त्यांच्याप्रती भक्तिभाव जागृत होणे आणि रात्रंदिवस त्यांचे अनुसंधान करून शेवटी त्यांच्या प्रत्यक्ष दर्शनाने केवलज्ञान प्राप्त होणे, हाच मोक्ष प्राप्तीचा सुरुवातीपासून ते शेवटपर्यंतचा मार्ग आहे, असे ज्ञानींनी सांगितले आहे.

श्री सीमंधर स्वामींची आराधना जेवढी अधिक प्रमाणात होईल, तेवढेच त्यांच्याबरोबरचे अनुसंधान सतत विशेष रूपाने होईल. यामुळे त्यांच्याबरोबरचे अनुसंधान गाढ होईल आणि शेवटी परम अवगाढपर्यंत पोहोचून त्यांच्या चरणकमळातच स्थान प्राप्तीची मोहोर लागेल.

श्री सीमंधर स्वामींपर्यंत पोहोचण्यासाठी सर्वप्रथम या भरत क्षेत्रातील सर्व ऋणानुबंधांपासून मुक्ती मिळवली पाहिजे आणि ते अक्रम ज्ञानाद्वारे प्राप्त झालेले आत्मज्ञान आणि पाच आज्ञांचे पालन केल्याने मिळू शकते. त्याचबरोबर श्री सीमंधर स्वामींची अनन्य भक्ती, आराधना रात्रंदिवस करत राहिल्याने त्यांच्याशी ऋणानुबंध स्थापित होतो, जो हा देह सुटताच तिथे जाण्याचा मार्ग करून देतो.

नैसर्गिक नियम असा आहे की, ज्याप्रमाणे आंतरिक परिणती असेल त्यानुसार पुढील जन्म निश्चित होतो, सध्या भरत क्षेत्रात पाचवा 'आरा' (कालचक्राचा बारावा भाग) चालू आहे. सर्व मनुष्य कलियुगी आहेत. अक्रम विज्ञान प्राप्त करून ज्ञानींच्या आज्ञेचे आराधन करू लागतात तेव्हापासूनच त्यांची आंतरिक परिणती शीघ्रतेने उच्च स्तराला पोहोचते. कलियुगी मनुष्यातून ते सत्युगी मनुष्य बनतात. आतमध्ये चौथा आरा प्रवर्तत असतो. बाहेर पाचवा आणि आत चौथा आरा! आतील परिणतींमध्ये परिवर्तन झाल्यामुळे ज्या ठिकाणी चौथा आरा चालू असतो त्या ठिकाणी मृत्यूनंतर हा जीव ओढला जातो. आणि त्यातही विशेष म्हणजे श्री सीमंधर स्वामींच्या भक्तीमुळे त्यांच्याशी ऋणानुबंध आधीच बांधला गेलेला असतो त्यामुळे त्यांच्या निकट, त्यांच्या श्रीचरणी तो जीव ओढला जातो. असे सर्व नियम आहेत निसर्गाचे!

संपूज्य दादाश्री नेहमी सांगत असत की, मूळनायक सीमंधर स्वामींची मंदिरे ठिकठिकाणी उभारली जातील. भव्य मंदिरे निर्माण होतील, घरोघरी सीमंधर स्वामींची पूजा-आरती केली जाईल, तेव्हा जगाचा नकाशा काही वेगळाच झालेला असेल!

भगवान श्री सीमंधर स्वामींविषयी थोडे जरी बोलले तरी लोकांच्या हृदयात त्यांच्याप्रती जबरदस्त भक्तिभाव सुरू होतो. म्हणून रात्रंदिवस दादा भगवानांच्या साक्षीने सीमंधर स्वामींना नमस्कार करत राहावे. दररोज सीमंधर स्वामींची आरती करावी आणि चाळीस वेळा नमस्कार करावा.

परम कृपाळू दादाश्री नेहमी सर्व मुमुक्षूंना पुढीलप्रमाणे नमस्कार विधीद्वारे श्री सीमंधर स्वामींबरोबर अनुसंधान करवून देत असत.

'प्रत्यक्ष दादा भगवानांच्या साक्षीने, वर्तमानात महाविदेह क्षेत्रात विचरत असणारे तीर्थंकर भगवान श्री सीमंधर स्वामींना अत्यंत भक्तिपूर्वक नमस्कार करीत आहे.'

हे शब्द म्हणजे अनुसंधान नाही, पण त्यावेळी मुमुक्षूंना ते स्वत: श्री सीमंधर स्वामींना नमस्कार करीत आहेत अशी अनुभूती होते, हे अनुसंधान आहे.

'प्रत्यक्ष दादा भगवानांच्या साक्षीने' असा शब्दप्रयोग यासाठी करण्यात आला आहे की, जोपर्यंत मुमुक्षूंची सरळ श्री सीमंधर स्वामींशी तार जोडलेली नाही तोपर्यंत ज्यांची तार निरंतर त्यांच्याशी जोडलेली आहे असे ज्ञानी पुरुष श्री दादा भगवानांच्या माध्यमाने आपण श्री सीमंधर स्वामींना आपला नमस्कार पोहोचवतो. ज्याचे फळ प्रत्यक्ष नमस्कार केल्याइतकेच मिळते. उदाहरणार्थ समजा आपल्याला एखादा संदेश अमेरिकेला पोहोचवायचा आहे परंतु तो संदेश आपण स्वत: पोहोचवू शकत नाही, म्हणून आपण तो संदेश पोस्ट ऑफिसला सुपूर्द करून निश्चिंत होऊन जातो. ही जबाबदारी पोस्ट ऑफिसची आहे आणि ती योग्य तऱ्हेने पूर्णही करते.याचप्रमाणे आपला संदेश श्री सीमंधर स्वामींपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी पूज्य दादाश्री स्वत:वर घेतात.

दादा भगवानांना साक्षी ठेवून नमस्कार विधी करावा. ज्यांना सम्यक् दर्शन प्राप्त झाले आहे, अशा समकितधारी महात्म्यांनी समजपूर्वक हा नमस्कार विधी केला तर त्याचे फळ अनन्य मिळते! मंत्र बोलताना एक-एक अक्षर लक्षपूर्वक वाचावे. त्यामुळे चित्त पूर्णपणे शुद्ध राहते. संपूर्ण चित्तशुद्धीपूर्वकचे नमस्कार म्हणजे स्वत: स्वत:लाच श्री सीमंधर स्वामींच्या मूर्ती स्वरूपाला प्रत्यक्ष नमस्कार करत आहे असे पाहावे. प्रत्येक नमस्कारासोबत स्वत:ला साष्टांग नमस्कार घालत आहोत असे दिसले पाहिजे. जेव्हा प्रभूंचे मूर्त स्वरूप दिसेल आणि त्याचबरोबर प्रभूंचे अमूर्त असे केवलज्ञान स्वरूप की जे मूर्त स्वरूपाहून भिन्न आहे, हे सुद्धा समजेल, तेव्हा समजावे की आपण श्री सीमंधर स्वामींच्या निकट पोहोचलो आहोत. दादाश्रींच्या श्रीमुखाने श्री सीमंधर स्वामींबरोबरच्या संधानाविषयी ऐकल्यावर अनेक लोकांना अशी अनुभूती झालेली आहे.

आशा आहे की, ज्यांना दादाश्रींना प्रत्यक्ष भेटण्याचा योग मिळाला नाही त्यांना ही पुस्तिका परोक्ष रूपाने संधानाची भूमिका स्पष्ट करवून देईल. जी व्यक्ती खरोखर मोक्षप्राप्तीसाठी इच्छुक असेल त्याचे श्री सीमंधर स्वामींशी अवश्य अनुसंधान होऊन जाईल. यापूर्वी कधीही उत्पन्न झाले नसेल असे जबरदस्त आकर्षण श्री सीमंधर स्वामींप्रती उत्पन्न झाले तर समजून जावे की प्रभूंच्या श्रीचरणात स्थान मिळण्याची वेळ समीप आली आहे.

सीमंधर स्वामींची प्रार्थना, विधी आणि सीमंधर स्वामींच्या श्रीचरणात सदैव नतमस्तक राहून त्यांचे अनन्य शरण प्राप्त करण्याची भावना सतत करावी. संपूज्य दादाश्रींनी वारंवार सांगितले आहे की आम्ही सुद्धा सीमंधर स्वामींजवळ जाणार आहोत आणि तुम्ही सुद्धा तिथेच पोहोचण्याची तयारी करा. त्याशिवाय एकावतारी किंवा दोन अवतारी होणे हे कठीण आहे! कारण पुढचा जन्म जर पुन्हा याच भरतभूमीवर झाला तर तेव्हा इथे भयंकर पाचवा आरा चालू असेल. तेव्हा इथे मोक्षाची गोष्ट तर दूरच राहिली परंतु पुन्हा मनुष्यजन्म मिळणे हे सुद्धा दुर्लभ आहे! अशा संयोगात आत्तापासूनच सावध होऊन, ज्ञानींनी दाखविलेल्या मार्गावर चालून एकावतारी पदाची प्राप्ती करून घ्यावी! पुन्हा-पुन्हा अशी संधी मिळणे शक्य नाही. वाहत्या पाण्याच्या प्रवाहाला पुन्हा पकडू शकत नाही. गेलेली वेळसुद्धा पुन्हा आणू शकत नाही. जो आलेली संधी गमावतो, त्याला पुन्हा संधी मिळत नाही. म्हणून आजपासूनच चिकाटीने मागे लागा आणि गात राहा....

'सीमंधर स्वामींचा असीम जय जयकार असो!'

सीमंधर स्वामी कोण आहेत? कुठे आहेत? कसे आहेत? त्यांचे पद काय आहे? तसेच त्यांचे महत्व किती आहे? अशी शक्य तेवढी सर्वच माहिती पूज्य दादाश्रींच्या स्वमुखातून निघाली होती. त्याचे इथे संक्षिप्तमध्ये संकलन होऊन प्रकाशित होत आहे. जे मोक्षमार्गींना त्यांच्या आराधनेकरिता अत्यंत उपयोगी सिद्ध होईल!

**-डॉ नीरूबहन अमीन**

# श्री सीमंधर स्वामींचे जीवनचरित्र

आपल्या भारत देशाच्या ईशान्य दिशेत करोडो किलोमीटर अंतरावर जंबुद्वीपाच्या महाविदेह क्षेत्राची सुरूवात होते. त्यात 32 'विजय' (क्षेत्रे) आहेत. या विजयांमध्ये आठवी विजय 'पुष्पकलावती' नगरी आहे. त्याची राजधानी श्री पुंडरिकगिरी आहे. या नगरीत मागील चोविसीचे सतरावे तीर्थंकर श्री कुन्थुनाथ भगवंतांच्या शासनकाळ आणि अठरावे श्री अरहनाथजींचा जन्म होण्यापूर्वीच्या काळात श्री सीमंधर स्वामीं भगवंतांचा जन्म झाला होता. त्यांचे वडील श्री श्रेयांस पुंडरिकगिरी नगरीचे राजा होते. सीमंधर स्वामींच्या आईचे नाव सात्यकी होते.

यथासमय महाराणी सात्यकीने अद्वितीय रूप-लावण्यमय, सर्वांग सुंदर, सुवर्ण कांतीमय तसेच वृषभाचे लांछन (चिन्ह) असलेल्या पुत्राला जन्म दिला. (वीर संवतच्या गणनेनुसार चैत्र कृष्णपक्ष दशमीच्या मध्यरात्री.) बाळ जीनेश्वर, यांना जन्मत:च मतिज्ञान, श्रुतज्ञान आणि अवधिज्ञान होते. त्यांचा देह पाचशे धनुष्याएवढा आहे. राजकुमारी श्री रुक्मिणी यांना प्रभूंची अर्धांगिनी बनण्याचे परम सौभाग्य प्राप्त झाले.

भरत क्षेत्रातील विसावे तीर्थंकर श्री मुनिसुव्रत स्वामी तसेच एकविसावे तीर्थंकर श्री नेमीनाथजी यांच्या प्राकट्य काळाच्या मध्यवर्ती काळात, अयोध्येत राजा दशरथाच्या शासन काळा दरम्यान आणि रामचंद्रजींच्या जन्मापूर्वी श्री सीमंधर स्वामींनी महाभिनिष्क्रमण उदय योगाने फाल्गुन शुक्ल पक्षाच्या तृतीयेच्या दिवशी दीक्षा अंगिकारली. दीक्षा घेताच त्यांना चौथे मन:पर्यव ज्ञान प्राप्त झाले. दोषकर्मांची निर्जरा होताच हजार वर्षांच्या छद्मस्थ काळानंतर बाकीच्या चार घाती कर्मांचा क्षय करून चैत्र शुक्ल त्रयोदशीच्या दिवशी भगवंत केवलज्ञानी आणि केवलदर्शनी झाले. त्यांच्या मात्र दर्शनानेच जीव मोक्षमार्गी बनू लागले.

श्री सीमंधर स्वामी प्रभूंच्या कल्याण यज्ञाच्या निमित्तांमध्ये चौऱ्यांशी गणधर, दहा लाख केवलज्ञानी महाराजा, शंभर करोड साधू, शंभर करोड

साध्वीजी, नऊशे करोड श्रावक आणि नऊशे करोड श्राविका यांचा समावेश आहे. स्वामींचे शासन रक्षक यक्षदेव श्री चांद्रायणदेव आहेत आणि यक्षिणीदेवी श्री पाचांगुलिदेवी आहेत.

पुढील चोवीशीचे आठवे तीर्थंकर श्री उदयस्वामींच्या निर्वाणानंतर, तसेच नववे तीर्थंकर श्री पेढाळस्वामींच्या जन्मापूर्वी श्री सीमंधर स्वामी आणि अन्य एकोणीस विहरमान तीर्थंकर भगवंत श्रावण शुक्ल पक्षाच्या तृतीयेच्या अलौकिक दिवशी चौऱ्यांशी लाखपूर्वचे आयुष्य पूर्ण करून निर्वाणपद प्राप्त करतील.

❖❖❖❖❖

# वर्तमान तीर्थंकर श्री सीमंधर स्वामी

## वर्तमान तीर्थंकरांच्या भक्तीने 'मोक्ष'

**प्रश्नकर्ता :** सीमंधर स्वामी कोण आहेत? ते समजावण्याची कृपा करावी!

**दादाश्री :** सीमंधर स्वामी वर्तमान तीर्थंकर साहेब आहेत. ते या पृथ्वीच्या बाहेरील दुसरे क्षेत्र, महाविदेह क्षेत्रात तीर्थंकर साहेब आहेत. जसे ऋषभदेव भगवंत झाले, महावीर भगवंत झाले.... त्यांच्यासारखे हे सीमंधर स्वामी तीर्थंकर आहेत.

तीन प्रकारचे तीर्थंकर असतात. एक भूतकाळातील तीर्थंकर, एक वर्तमानकाळातील तीर्थंकर आणि एक भविष्यकाळातील तीर्थंकर. यातील भूतकाळातील तीर्थंकर तर होऊन गेले. त्यांचे स्मरण केल्याने आपल्याला पुण्यफळ मिळते. त्याशिवाय आता ज्यांचे शासन चालू आहे त्यांच्या आज्ञेत राहिल्याने धर्मध्यान उत्पन्न होते. ते आपल्याला मोक्षाकडे घेऊन जाणारे ठरते.

परंतु जर आपण वर्तमान तीर्थंकरांचे स्मरण केले तर ती गोष्टच वेगळी असते! खरी तर वर्तमानाचीच किंमत आहे. रोख रुपये असतील तर त्याचीच किंमत असते. जे नंतर येतील ते रुपये भावी! आणि (भूतकाळातील तर) जे गेले ते गेले! म्हणजे रोख गोष्ट पाहिजे आपल्याला! म्हणूनच रोख असलेल्यांची ओळख करून देत आहोत ना! आणि या साऱ्या गोष्टीसुद्धा रोखच आहेत. धीस इज द कॅश बँक ऑफ डिवाइन

सोल्यूशन! रोख पाहिजे उधार चालणार नाही आणि चोवीस तीर्थंकरांना सुद्धा आपण नमस्कार करत असतो ना!

चोवीस तीर्थंकरांना संयति पुरुष का म्हणत असत? भूतपूर्व तीर्थंकर म्हणत होते. अर्थात जे भूतकाळात होऊन गेले ते. आपण वर्तमान तीर्थंकरांना शोधून काढले पाहिजे. कारण भूतकाळातील तीर्थंकरांची भक्ती केल्याने संसारात आपली प्रगती होईल परंतु मोक्षफळ प्राप्त होणार नाही. मोक्षफळ तर आज जे हजर आहेत तेच देतात.

## 'नमो अरिहंताणं' आज कोण?

लोक जे नवकार मंत्र बोलतात ते कोणत्या समजुतीने बोलतात? मी त्या लोकांना विचारले, तेव्हा ते मला म्हणाले, 'चोवीस तीर्थंकर हेच अरिहंत आहेत ना!' त्यावर मी म्हणालो, 'तुम्ही जर त्यांना अरिहंत म्हणाल तर मग सिद्ध कोणाला म्हणाल?' ते अरिहंत होते, पण आता तर ते सिद्ध होऊन गेले, मग आता अरिहंत कोण? हे लोक अरिहंतला मानतात पण ते 'अरिहंत' कोणाला मानतात? 'नमो अरिहंताणं' बोलतात ना?

हे चोवीस तीर्थंकर आहेत ना, ते अरिहंत म्हटले जात होते, परंतु जोपर्यंत ते जिवंत होते तोपर्यंत. आता तर ते निर्वाण होऊन मोक्षाला गेले, म्हणून ते सिद्ध म्हटले जातात. अर्थात आता ते 'नमो सिद्धाणं' पदामध्ये आले. यांना अरिहंताणं म्हणत नाहीत. जे चोवीस तीर्थंकरांना अरिहंत मानतात त्यांना हे माहीत नाही की ते तर 'सिद्ध' होऊन गेले. म्हणजे हे असे चुकीचे चालले आहे. म्हणून नवकार मंत्र फळ देत नाही. मग मी त्यांना समजावले की अरिहंत हे आता सीमंधर स्वामी आहेत, जे हजर आहेत, जिवंत आहेत, तेच अरिहंत.

जे तीर्थंकर झाले ते सांगून गेले की, 'आता भरतक्षेत्रात चोवीसी बंद होत आहे, आता येथे तीर्थंकर होणार नाहीत. परंतु महाविदेह क्षेत्रात

तीर्थंकर आहेत, त्यांची भक्ती करा! तिथे वर्तमान तीर्थंकर आहेत.' पण आता हे तर लोकांच्या लक्षातच राहिले नाही आणि ते त्या भूतकाळातील चोवीस तीर्थंकरांनाच तीर्थंकर मानतात!! बाकी, भगवंत तर सर्व काही सांगून गेले आहेत.

महावीर भगवंतांनी हे सर्व स्पष्ट केले होते! महावीर भगवंतांना माहीत होते की आता कोणी अरिहंत तर नाहीत, तेव्हा हे लोक कोणाची भक्ती करतील? म्हणून त्यांनी हे स्पष्ट केले की महाविदेह क्षेत्रात तीर्थंकर आहेत आणि त्यांच्यात सीमंधर स्वामीसुद्धा आहेत. हे स्पष्ट केले म्हणून मग ते मान्य झाले. मार्गदर्शन महावीर भगवानांचे होते, नंतर कुंदकुंदाचार्यांनाही तसा योग जुळून आला.

अरिहंत म्हणजे वर्तमानात अस्तित्व असले पाहिजे. ज्यांचे निर्वाण होऊन गेले, त्यांना तर सिद्ध म्हटले जाते. निर्वाण झाल्यानंतर त्यांना अरिहंत म्हणू शकत नाही.

## नवकार मंत्र केव्हा फळ देईल?

म्हणूनच सांगावे लागले की, 'अरिहंतांना नमस्कार करा.' तेव्हा विचारतात की, 'अरिहंत कुठे आहेत आता?' तेव्हा मी सांगितले की 'सीमंधर स्वामींना नमस्कार करा. सीमंधर स्वामी या ब्रह्मांडात आहेत. ते आज अरिहंत आहेत, म्हणून त्यांना नमस्कार करा! ते आज हजर आहेत. अरिहंत रूपात असायला हवेत, तेव्हाच आपल्याला फळ मिळते.' अतः संपूर्ण ब्रह्मांडात 'अरिहंत जिथे कुठे असतील त्यांना मी पण नमस्कार करतो.' असे समजून बोललो तर त्याचे खूप सुंदर फळ मिळते.

**प्रश्नकर्ता :** परंतु वर्तमानात विहरमान वीस तीर्थंकर तर आहेतच ना?

**दादाश्री :** हो, त्या वर्तमानातील वीस तीर्थकरांना अरिहंत मानले तर तुमचे नवकार मंत्र फळ देईल, नाही तर फळ मिळणार नाही. म्हणून

या सीमंधर स्वामींची भक्ती आवश्यक आहे, तेव्हाच मंत्र फळ देईल. कित्येक लोक या वीस तीर्थंकरांना जाणत नसल्यामुळे किंवा मग 'त्यांचे आणि आमचे काय देणेघेणे?' असे समजून चोवीस तीर्थंकर (जे आपल्या या भरत क्षेत्रात होऊन गेलेत) त्यांनाच 'हे अरिहंत आहेत' असे मानतात, आज वर्तमानात असायला पाहिजेत तेव्हाच फळ प्राप्त होईल. अशा तर कितीतरी चुका होत असल्यामुळे हे नुकसान होत आहे.

नवकार मंत्र बोलताना त्यासोबत सीमंधर स्वामी लक्षात असायला पाहिजेत तरच तुमचा नवकार मंत्र शुद्ध रूपाने म्हटला गेला असे म्हटले जाईल.

लोक मला विचारतात की, तुम्ही सीमंधर स्वामींचे नाव घ्यायला का सांगता? चोवीस तीर्थंकरांचे घ्यायला का नाही सांगत? मी म्हणालो की, चोवीस तीर्थंकरांचे नाव तर घेतच असतो पण आम्ही योग्य पद्धतीने घेतो आणि सीमंधर स्वामींचे जास्त बोलत असतो, कारण ते वर्तमान तीर्थंकर आहेत आणि 'नमो अरिहंताणं' त्यांनाच पोहोचते.

## हे तर प्रकट, प्रत्यक्ष, साक्षात् भगवंत

**प्रश्नकर्ता :** सीमंधर स्वामी प्रकट म्हटले जातात का?

**दादाश्री :** हो, ते प्रकट म्हटले जातात. प्रत्यक्ष, साक्षात् (हजर) आहेत. देहधारी आहेत. आणि सध्या महाविदेह क्षेत्रात तीर्थंकर रूपात विचरत आहेत.

**प्रश्नकर्ता :** सीमंधर स्वामी तर आता महाविदेह क्षेत्रात आहेत. मग ते आमच्यासाठी प्रकट आहेत असे कसे म्हणू शकतो?

**दादाश्री :** सीमंधर स्वामी कलकत्त्यामध्ये असतील आणि आपण त्यांना पाहिलेले नसेल तरी पण ते प्रकट मानले जातात. तसेच या महाविदेह क्षेत्राचेही आहे.

## प्रत्यक्ष-परोक्षच्या स्तुतीमध्ये फरक

**प्रश्नकर्ता :** आपण महावीर भगवंतांची स्तुती केली, प्रार्थना केली आणि सीमंधर स्वामींची स्तुती केली, प्रार्थना केली तर या दोघांच्या फलश्रुतीत काय फरक पडतो?

**दादाश्री :** महावीर भगवंत तर स्वतःची स्तुती ऐकतच नाहीत, परंतु जर कोणी सीमंधर स्वामींचे नाव घेत नसेल पण महावीर भगवंतांचे नाव घेत असेल तरीही ते चांगलेच आहे. परंतु महावीर भगवंतांचे नाव ऐकणार कोण? ते स्वतः तर सिद्धगतीत जाऊन बसले आहेत. त्यांना इथे काही देणेघेणे नसते ना! हे तर आपण स्वतःहून त्यांचे रूपक बनवून बनवून स्थापित करत राहतो. ते आता तीर्थंकरसुद्धा नाहीत. ते तर आता सिद्धच आहेत. हे सीमंधर स्वामी हजर आहेत, तेच फळ देतील.

**प्रश्नकर्ता :** अर्थात जे फळ मिळते ते 'नमो अरिहंताणं'चेच फळ मिळते, असेच झाले ना? मग 'नमो सिद्धाणं'चे काहीच फळ नाही?

**दादाश्री :** अन्य काही फळ मिळत नाही. हे तर विचारले की, 'भाऊ, कोणत्या स्टेशनला जायचे आहे?' तेव्हा आपण ठरवायचे की मुंबईला जायचे आहे. मग मुंबई आपल्या लक्षात राहते. तसेच मोक्षाला जायचे आहे, सिद्धगतीत जायचे आहे हे लक्षात राहते. बाकी, सर्वश्रेष्ठ उपकारी तर अरिहंतच म्हटले जातात. अरिहंत कोणाला म्हणायचे? तर जे हजर असतात त्यांना. जे गैरहजर असतात त्यांना अरिहंत म्हटले जात नाही. प्रत्यक्ष असले पाहिजेत म्हणून तुम्ही सदैव सीमंधर स्वामींना लक्षात ठेवा. तसे तर वीस तीर्थंकर आहेत. पण दुसरी सर्व नावे आपल्या लक्षात राहतील का? त्यापेक्षा आपल्या हिंदुस्तानासाठी जे विशेष महत्त्वपूर्ण मानले जातात ते आहेत सीमंधर स्वामी. त्यांच्यावरच लक्ष केंद्रित करा आणि त्यांच्यासाठीच जीवन अर्पण करा.

## दृष्टी, भगवंताच्या दर्शनाची

**प्रश्नकर्ता :** महाविदेह क्षेत्रात सीमंधर स्वामींची प्रवृत्ती कोणती आहे ?

**दादाश्री :** त्यांची कसली प्रवृत्ती ? बस, ते तर वीतराग भगवंत! लोक त्यांचे दर्शन करतात आणि ते वीतराग भावाने वाणी बोलतात.

**प्रश्नकर्ता :** देशना ?

**दादाश्री :** हो, बस, देशना देतात.

**प्रश्नकर्ता :** सीमंधर स्वामी महाविदेह क्षेत्रात आणखी काय करतात ?

**दादाश्री :** त्यांना तर काहीच करायचे नसते ना. कर्मांच्या उदयानुसार, उदयकर्मे जे करवतील तसे करतात. त्यांचा स्वत:चा इगोइजम (अहंकार) संपून गेलेला असतो आणि पूर्ण दिवस ते ज्ञानातच राहतात. जसे महावीर भगवंत राहत होते तसे. त्यांचे खूप सारे अनुयायी आहेत.

## फक्त दर्शनानेच मोक्ष

**प्रश्नकर्ता :** सीमंधर स्वामींच्या दर्शनाचे वर्णन करा.

**दादाश्री :** सीमंधर स्वामींचे वय आता दीड लाख वर्ष आहे. ते ॠषभदेव भगवंतांसारखे आहेत, ॠषभदेव भगवंत संपूर्ण ब्रम्हांडाचे भगवंत म्हटले जातात, तसेच सीमंधर स्वामी सुद्धा संपूर्ण ब्रह्मांडाचे भगवंत म्हटले जातात. ते आपल्या येथे नाहीत परंतु दुसऱ्या भूमीवर आहेत. जिथे मनुष्य पोहोचू शकत नाही. (जेव्हा ज्ञानींना काही महत्त्वाचे विचारायचे असते तेव्हा) ज्ञानी स्वत:ची शक्ती तिथे पाठवतात. ती शक्ती विचारून परत येते. आपण तिथे स्थूल देहाने जाऊ शकत नाही, पण जेव्हा तिथे जन्म होतो तेव्हा जाऊ शकतो.

आपल्या इथे भरत क्षेत्रात तीर्थंकरांचा जन्म होत होता, पण आता अडीच हजार वर्षांपासून बंद झाले आहे! तीर्थंकर म्हणजे अंतिम, 'फूल मून' (पौर्णिमेचा चंद्र). पण तिथे महाविदेह क्षेत्रात तीर्थंकर कायम जन्म घेतात. सीमंधर स्वामी आज तिथे हयात आहेत.

**प्रश्नकर्ता :** ते अंतर्यामी आहेत का?

**दादाश्री :** ते आपल्याला पाहू शकतात. आपण त्यांना पाहू शकत नाही, ते पूर्ण जगाला पाहू शकतात.

सीमंधर स्वामी दुसऱ्या क्षेत्रात आहेत, ही बुद्धीच्या पलिकडील गोष्ट आहे, पण हे माझ्या ज्ञानात आलेले आहे. हे सामान्य लोकांना समजणार नाही. परंतु आम्हाला एक्जेक्ट (जसे आहे तसे) समजते. त्यांच्या दर्शनानेच लोकांचे कल्याण होईल.

**प्रश्नकर्ता :** त्यांचा देह कसा असतो मनुष्यासारखा? आपल्यासारखा?

**दादाश्री :** देह आपल्यासारखाच, माणसासारखाच आहे.

**प्रश्नकर्ता :** त्यांच्या देहाचे प्रमाण काय आहे?

**दादाश्री :** प्रमाण खूप मोठे, विशाल असते. त्यांची उंची खूप आहे. त्यांना आयुष्य सुद्धा खूप आहे. प्रत्येक गोष्ट वेगळीच आहे.

## महाविदेह क्षेत्र कुठे? कसे?

**प्रश्नकर्ता :** सीमंधर स्वामी जिथे विचरतात ते महाविदेह क्षेत्र कुठे आहे?

**दादाश्री :** ते तर आपल्या या भरत क्षेत्रापेक्षा खूपच वेगळे आहे, ईशान्य दिशेत आहे. सर्व क्षेत्रे वेगवेगळी आहेत. तिथे आपण जाऊ शकत नाही.

**प्रश्नकर्ता :** महाविदेह क्षेत्र हे आपल्या भरतक्षेत्रापेक्षा वेगळे मानले जाते का?

**दादाश्री :** हो, वेगळे. हे एक महाविदेह क्षेत्रच असे आहे की, जिथे सदैव तीर्थंकर जन्माला येतात आणि येथे आपल्या क्षेत्रात काही निश्चित काळातच तीर्थंकर जन्माला येतात, त्यानंतर नाही. आपल्या येथे काही काळापुरते तीर्थंकर नसतातही. पण आता हे जे सीमंधर स्वामी आहेत ते आपल्यासाठी आहेत. ते अजून दीर्घकाळापर्यंत राहणार आहेत.

## भूगोल, महाविदेह क्षेत्राचे

**प्रश्नकर्ता :** आता महाविदेह क्षेत्राविषयी सविस्तर माहिती सांगा. इतके योजन दूर हा मेरू पर्वत, या ज्या गोष्टी शास्त्रात लिहिलेल्या आहेत, त्या बरोबर आहेत का?

**दादाश्री :** हो बरोबर आहे. त्यात फरक नाही. त्या गोष्टींमध्ये तथ्य आहे. हो, इतक्या वर्षांचे आयुष्य, आणि आणखी किती वर्ष राहतील, असे हे सर्व सुनियोजित आहे. संपूर्ण ब्रह्मांड आहे, त्यात मध्यलोक आहे आणि त्यात पंधरा प्रकारची क्षेत्रे आहेत. मध्यलोक गोलाकार आहे परंतु लोकांना या दुसऱ्या काही गोष्टी समजणार नाहीत. कारण एका वातावरणातून दुसऱ्या वातावरणात जाता येत नाही अशी क्षेत्रे आहेत आत. मनुष्याला जन्म घेण्यायोग्य आणि राहण्यायोग्य पंधरा क्षेत्रे आहेत. त्यातील एक आपली भूमी आहे. त्या व्यतिरिक्त इतर चौदा क्षेत्रे आहे. तिथे सुद्धा आपल्यासारखीच माणसे आहेत. आपल्या येथील माणसे कलियुगी आहेत आणि तेथे सत्युगी आहेत. काही ठिकाणी कलियुग आहे आणि काही ठिकाणी सत्युगसुद्धा आहे. अशा प्रकारे मनुष्य आहेत आणि तिथे महाविदेह क्षेत्रात तर आता प्रत्यक्ष सीमंधर स्वामी हजर आहेत. आता त्यांचे वय दीड लाख वर्ष आहे आणि ते आणखी सव्वा लाख वर्ष राहणार आहेत. श्रीरामाच्या वेळेस ते होते. श्रीराम ज्ञानी होते. ते येथे जन्माला आले होते पण ते सीमंधर स्वामींना पाहू शकले होते.

सीमंधर स्वामी तर त्यांच्याही पूर्वीचे, खूप पूर्वीचे आहेत! हे जे सीमंधर स्वामी आहेत त्यांना जगकल्याण करायचे आहे.

## श्री सीमंधर स्वामी, भरत क्षेत्राच्या कल्याणाचे निमित्त

**प्रश्नकर्ता :** जसे महाविदेह क्षेत्रात आता वर्तमानात तीर्थंकर विराजमान आहेत, असे दुसऱ्या एखाद्या क्षेत्रात तीर्थंकर विराजमान आहेत का?

**दादाश्री :** पाच भरत क्षेत्रात आणि पाच ऐरावत क्षेत्रात आता कोणी तीर्थंकर विराजमान नाहीत. अन्य पाच महाविदेह क्षेत्र आहेत तिथे आता चौथा *आरा* (कालचक्राचा एक भाग) चालू आहे, तिथे तीर्थंकर विचरत आहेत. तिथे सदैव चौथा *आरा* असतो. आणि आपल्या इथे तर पहिला, दुसरा, तिसरा, चौथा, पाचवा, सहावा-असे *आरे* बदलत राहतात.

**प्रश्नकर्ता :** आपल्या इथे तीर्थंकर केव्हा असतात?

**दादाश्री :** इथे तिसऱ्या-चौथा *आऱ्यात* तीर्थंकर होतात!

**प्रश्नकर्ता :** आणि तीर्थंकर, हे आपल्या इथे हिंदुस्तानातच होतात, अन्य कोठेही होत नाही ना?

**दादाश्री :** याच भूमीवर! या हिंदुस्तानाच्याच भूमीवर! याच भूमीवर तीर्थंकर होतात, इतर कुठल्याही जागी होत नाही. चक्रवती सुद्धा याच भूमीवर होतात, अर्धचक्रवती सुद्धा याच भूमीवर होतात. सर्व त्रेसष्ठ शलाका पुरुष सुद्धा इथेच होतात.

**प्रश्नकर्ता :** या भूमीचे काही महत्त्व असेल का?

**दादाश्री :** ही भूमी खूप उच्च मानली जाते!

**प्रश्नकर्ता :** सीमंधर स्वामींचेच पूजन कशासाठी? अन्य वर्तमान तीर्थंकरांचे पूजन का नाही?

**दादाश्री :** सगळ्या तीर्थंकरांचे होऊ शकते पण सीमंधर स्वामींचा हिंदुस्तानाबरोबर हिसोब (संबंध) आहे, त्यांची भावना आहे. वीस तीर्थंकरांमधून सीमंधर स्वामींचीच विशेष रूपाने भक्ती केली पाहिजे कारण की आपल्या भरत क्षेत्राच्या सर्वात जवळ तेच आहेत आणि भरत क्षेत्राबरोबर त्यांचे ऋणानुबंध आहे.

वर्तमानात वीस तीर्थंकर आहेत. त्यातील फक्त तीर्थंकर श्री सीमंधर स्वामींचाच भरत क्षेत्राबरोबर ऋणानुबंधाचा हिशोब आहे. तीर्थंकरांचा सुद्धा हिशोब असतो आणि सीमंधर स्वामी तर आज साक्षात प्रकट भगवंत आहेत.

म्हणून तुम्ही आता अरिहंत कोणाला मानाल? तर सीमंधर स्वामींना, आणि जे इतर एकोणीस तीर्थंकर आहेत ते सर्व अरिहंतच आहेत पण त्या सर्व तीर्थंकरांसोबत संबंध ठेवण्याची काही गरज नाही. एकाची आराधना केल्याने बाकीचे सर्वच येऊन जातात. तेव्हा तुम्ही आता सीमंधर स्वामींचे दर्शन करा. 'हे अरिहंत भगवंत! तुम्हीच खरे अरिहंत आहात आता!' असे बोलून नमस्कार करावा.

## तिथे आहे मन-वचन-कायेची एकता

महाविदेह क्षेत्रात सुद्धा माणसे आहेत. ती आपल्यासारखीच आहेत, देहधारीच आहेत. तेथील माणसांचेही जिव्हाळे आपल्या सारखेच आहेत.

**प्रश्नकर्ता :** तिथे तर खूप आयुष्य असते ना दादाजी?

**दादाश्री :** हो, जास्त आयुष्य असते, खूपच आयुष्य असते. बाकी, आपल्यासारखीच माणसे आहेत, आपल्यासारखाच व्यवहार आहे. पण आपल्या इथे चौथा *आऱ्यात* जसा व्यवहार होता तसा तिथे व्यवहार आहे. या पाचव्या *आऱ्यातील* लोक तर आता खिसे कापायला शिकले आणि आतल्या आत नातेवाईकांची निंदा करण्याचेही शिकले. महाविदेह क्षेत्रात असा व्यवहार नाही.

**प्रश्नकर्ता :** तिथे सुद्धा अशाच प्रकारचा सर्व संसार आहे का?

**दादाश्री :** हो, असेच सर्व. ती सुद्धा कर्मभूमी आहे. तेथील लोकांनाही 'मी करतो' असे भान असते. त्यांच्यातही अहंकार, क्रोध-मान-माया-लोभ आहे. सध्या तिथे तीर्थंकर हजर आहेत आणि आपल्या येथे चौथ्या *आऱ्यात* तीर्थंकर असतात. बाकी दुसऱ्या सर्व गोष्टी आपल्यासारख्याच असतात.

चौथ्या आणि पाचव्या *आऱ्यात* काय फरक असते? तर चौथ्या *आऱ्यात* मन-वचन-कायेची एकता असते आणि पाचव्या *आऱ्यात* ही एकता तुटून गेलेली असते. अर्थात जसे मनात असते, तसे वाणीत नसते आणि जसे वाणीत असते तसे वर्तनात आणत नाही, याचे नाव पाचवा *आरा.* (ही पाचव्या *आऱ्याची* लक्षणे) आणि चौथ्या *आऱ्यात* तर जसे मनात असते तसेच बोलतात आणि तसेच करतात. चौथ्या *आऱ्यात* जर एखादा मनुष्य म्हणाला की मला पूर्ण गावच पेटवून देण्याचे विचार येत आहेत, तेव्हा आपण समजून जावे की, हे कधीतरी रूपकात येणारच. आणि येथे आज जर कोणी म्हणाले की मी तुमचे घर जाळून खाक करेन, तर आपण समजावे की अजून तर फक्त मनातच आहे पण हे करण्यासाठी तू मला केव्हा भेटशील काय माहीत? तोंडाने बोलला असेल तरी पण त्यात काही सामर्थ्य नसते. 'मी तुम्हाला मारून टाकेन' असे म्हणतो पण त्या बोलण्यात काही तथ्य नसते. मन-वचन-कायेची एकता राहिलेली नाही. मग बोलल्याप्रमाणे कार्य कसे होऊ शकेल? कार्य होणारच नाही ना!

## तिथे कोणत्या पात्रतेने जाऊ शकतो?

**प्रश्नकर्ता :** मनुष्याला जर महाविदेह क्षेत्रात जायचे असेल तर कोणत्या प्रकारे मनुष्य जाऊ शकेल?

**दादाश्री :** तो 'जेव्हा महाविदेह क्षेत्रासारखा झाला असेल' तेव्हा,

म्हणजे या पाचव्या आऱ्याचे दुर्गुण निघून गेले की तो तिथे जाऊ शकतो. म्हणजे कोणी शिवी दिली तरी पण मनात शिवी देणाऱ्यासाठी वाईट भाव होत नसतील तेव्हा या पाचव्या आऱ्याचे दुर्गुण निघून गेले की तो तिथे जाऊ शकतो.

**प्रश्नकर्ता :** साधारणपणे इथून सरळ मोक्षाला जाता येत नाही. आधी महाविदेह क्षेत्रात जायचे मग तिथून मोक्षाला जायचे, असे का?

**दादाश्री :** क्षेत्राचा स्वभाव असा आहे की, मनुष्याची लक्षणे ज्या *आऱ्याच्या* लायक असतील, तिथे ते खेचले जातात. इथे जी चौथ्या *आऱ्याच्या* लायक झाली असतील, मग जरी त्यांना हे ज्ञान मिळाले नसेल तरी ती तिथे चौथ्या *आऱ्यात* खेचली जातात. आणि तेथील मनुष्यांची लक्षणे जर पाचव्या *आऱ्याच्या* लायक झाली असतील ते इथे पाचव्या आऱ्यात (जन्माला) येतात, असा क्षेत्राचा स्वभाव आहे. कुणाला आणावे-पाठवावे लागत नाही. क्षेत्राच्या स्वभावानुसार हे सर्व लोक तीर्थंकरांजवळ पोहोचतील. म्हणून जे सीमंधर स्वामींचे नित्य स्मरण करतात, त्यांची भक्ती-आराधना करतात, असे लोक नंतर त्यांचे दर्शन करतील आणि त्यांच्याजवळ बसतील आणि मोक्ष प्राप्त करतील.

आम्ही ज्यांना ज्ञान देतो, ते एक-दोन जन्म घेतील. नंतर त्यांना सीमंधर स्वामींजवळच जायचे आहे त्यांचे दर्शन करण्यासाठी. तीर्थंकरांचे दर्शन करायचेच फक्त बाकी राहिले. बस, दर्शन होताच मोक्ष. बाकी सर्व दर्शन झाले. हे शेवटचे दर्शन घेतले, जे या दादाजींपेक्षाही पुढचे दर्शन आहे, ते दर्शन झाले की लगेच मोक्ष.

**प्रश्नकर्ता :** जितके लोक सीमंधर स्वामींचे दर्शन करतात, ते सर्व नंतर मोक्षाला जातात ना?

**दादाश्री :** फक्त असे दर्शन केल्याने मोक्षाला जातील असे काही नसते. त्यांची कृपा प्राप्त झाली पाहिजे. तिथे त्यांचे हृदय निर्मळ झाल्यानंतर

स्वामींची कृपा प्राप्त होते. ते तर त्यांचे ऐकण्यासाठी येतात आणि कानाला खूप मधुर वाटते पण मग ऐकल्यानंतर पुन्हा जसेच्या तसेच. त्यांना तर फक्त चटणीच आवडत असते. जेवणाचे पूर्ण ताट समोर असेल तरी फक्त एका चटणीसाठीच ताट धरून बसून राहिला तर मोक्ष होत नाही.

## त्यांच्यासाठी तर समोरून येते महाविदेह क्षेत्र

ज्याला इथे शुद्धात्म्याचे लक्ष्य बसले असेल, तो इथे भरत क्षेत्रात राहूच शकत नाही. ज्याला आत्म्याचे लक्ष बसले असेल तो मग महाविदेह क्षेत्रातच जाऊन पोहोचतो, असा नियम आहे! इथे दूषमकाळात तो राहूच शकत नाही. ज्याला शुद्धात्म्याचे लक्ष्य प्राप्त झाले तो महाविदेह क्षेत्रात एक किंवा दोन जन्म घेऊन तीर्थंकरांचे दर्शन करून मोक्षाला निघून जातो, असा हा सरळ-सोपा मार्ग आहे.

## त्यांचे अनुसंधान 'दादा भगवान' द्वारे

सीमंधर स्वामींना 'फोन' करायचा असेल तर त्यासाठी फोनचे माध्यम असले पाहिजे, तरच फोन पोहचेल. हे माध्यम आहे 'दादा भगवान.' समजा महावीर भगवान आज दिल्लीत असतील आणि इथून त्यांचे नाव घेतले तर त्यांच्यापर्यंत पोहोचेल की नाही? त्याचप्रमाणे हे सुद्धा पोहोचते. हा फोन जरा अर्धा मिनिट उशीरा पोहोचतो, पण नक्की पोहोचतो.

सीमंधर स्वामी स्वत: हजर आहेत पण ते आपल्या पृथ्वीतलावर नाहीत, दुसऱ्या पृथ्वीवर आहेत. त्यांच्याशी आमची (दादाश्रींची) तार जोडलेली आहे. या संपूर्ण जगाचे कल्याण व्हायलाच पाहिजे. आम्ही तर निमित्त आहोत, म्हणून 'दादा भगवान' थ्रू (द्वारे) तुम्हाला दर्शन करवितो आणि ते तिथपर्यंत पोहोचते. म्हणूनच आम्ही एक जन्म सांगितला आहे ना! इथून मग तिथेच जायचे आहे आणि सीमंधर स्वामींजवळच बसायचे आहे, त्या नंतर मुक्ती होईल. म्हणून आजपासूनच ओळख करून देतो आणि 'दादा भगवान' थ्रू नमस्कार करवून घेतो.

सीमंधर स्वामींशी आमची इतकी चांगली ओळख आहे की आम्ही सांगितल्याप्रमाणे तुम्ही दर्शन केलेत तर ते थेट त्यांच्यापर्यंत पोहोचेल.

## ...ते 'दादा भगवान' द्वारे अवश्य पोहोचते

**प्रश्नकर्ता :** आम्ही भक्ती केली तर ती सीमंधर स्वामींपर्यंत कशी पोहोचेल? कारण ते तर महाविदेह क्षेत्रात आहेत आणि आपण तर इथे आहोत.

**दादाश्री :** कलकत्त्यात असतील तर पोहोचेल की नाही पोहोचेल?

**प्रश्नकर्ता :** तिथे तर पोहोचते, परंतु हे तर खूपच दूर आहे ना?

**दादाश्री :** हे कलकत्त्यासारखेच आहे. डोळ्याने दिसत नाही ते सर्व कलकत्त्यासारखेच म्हणायचे. ते कलकत्त्यात असोत की बडोद्यात असोत, ते आता डोळ्यांनी दिसत नाहीत ना!

**प्रश्नकर्ता :** आपण जी भक्ती करतो, भाव करतो ते सर्व त्यांच्यापर्यंत पोहोचते?

**दादाश्री :** लगेचच पोहोचते. एक प्रत्यक्ष आणि एक परोक्ष. परोक्ष तर कितीतरी दूर असते आणि प्रत्यक्ष तर समोर हजरच असते की जे या डोळ्यांनी दिसते इंद्रियांनी!

**प्रश्नकर्ता :** पण परोक्षचा लाभ किती? परोक्ष आणि प्रत्यक्षच्या लाभात किती फरक?

**दादाश्री :** परोक्ष तीन मैल दूर असो की लाख मैल दूर असो तरी पण तेच आहे. अर्थात दूर आहे त्याने काही फरक पडत नाही.

**प्रश्नकर्ता :** परंतु ते प्रत्यक्ष तीर्थंकर आहेत ना?

**दादाश्री :** मुळात तर प्रत्यक्षाशिवाय काही काम होतच नाही ना!

आता तर त्यांच्याशी तुमची ओळख करून देत आहोत. हे जे आम्ही दररोज तुमच्याकडून वदवून घेतो ना, तर तिथे जावे लागेल. त्यांचे दर्शन कराल त्या दिवशी मुक्ती! हेच शेवटचे दर्शन.

**प्रश्नकर्ता :** महाविदेह क्षेत्रात?

**दादाश्री :** हो, आम्ही तर खटपट करणारे. (कल्याणासाठी खटपट करणारे) आहोत. आमच्याकडे एकावतारी पद प्राप्त होते. आमच्याकडे परिपूर्ण होऊ शकत नाही, म्हणून तुम्हाला सीमंधर स्वामींचे नाव घ्यायला सांगतो ना! दररोज सीमंधर स्वामींचे दर्शन, तेथील पंच परमेष्ठींचे, अन्य एकोणीस तीर्थंकरांचे, हे सर्व जे रोज म्हणायला सांगतो ते एकाच हेतूसाठी की आता तुमचे आराधक पद तिथे आहे.

आता येथे या क्षेत्रात आराधक पद राहिले नाही! म्हणून आम्ही दादा भगवानांच्या साक्षीने तेथील ओळख करवून देतो. मी एका व्यक्तीला सांगितले की 'भाऊ, तुम्ही असे समजा की हे महाविदेह क्षेत्र आहे आणि तुम्ही महाविदेह क्षेत्रात आहात अशी कल्पना करा. सीमंधर स्वामी तेथे कलकत्त्यात आहेत तर तुम्ही इथून दर्शन करण्यासाठी कलकत्त्याला किती वेळा जाल? किती वेळा जाऊ शकाल?

**प्रश्नकर्ता :** एक वेळा किंवा जास्तीत जास्त दोन वेळा.

**दादाश्री :** हो, जास्तीत जास्त दोन वेळा. तर महाविदेह क्षेत्रात जो लाभ मिळतो, तो लाभ आपल्या या क्षेत्रात दररोज मिळेल असे मी करून देईन. अशी चावी माझ्याकडे आहे. म्हणून सीमंधर स्वामींनी अशी नोंद घेतली की असे कोणी भक्त झाले नाहीत की जे रोजच दर्शन करतात. परदेशात आहेत तरी रोजच दर्शन करण्यासाठी येतात! तिथे जाण्यासाठी आपल्याला गाडीची गरज नाही की घोड्याचीही गरज नाही. फक्त दादा भगवान थ्रू म्हटले म्हणजे नमस्कार पोहोचतो.

## माध्यमाशिवाय, पोहोचत नाही

**प्रश्नकर्ता :** 'प्रत्यक्ष दादा भगवानांच्या साक्षीने सीमंधर स्वामींना नमस्कार करतो,' हे सीमंधर स्वामींना पोहोचते. ते 'पाहू' शकतात ही वास्तविकता आहे ना?

**दादाश्री :** ते पाहताना सामान्य भावाने पाहतात. तीर्थंकर विशेष भावाने पाहत नाहीत. या दादा भगवानांच्या माध्यमाने म्हटले आहे म्हणून तिथपर्यंत पोहोचते. माध्यमाशिवाय तर पोहोचत नाही ना!

## भिन्न, मी आणि 'दादा भगवान'

पुस्तकात जसे लिहिले आहे की हे जे दिसतात ते 'ए.एम.पटेल' आहे, मी ज्ञानी पुरुष आहे आणि आत 'दादा भगवान' प्रकट झाले आहेत. ते 'चौदालोक'चे नाथ आहेत. म्हणजे जे कधी ऐकण्यातही आले नसेल असे इथे प्रकट झालेले आहेत. म्हणूनच 'मी स्वतः भगवान आहे' असे आम्ही कधीच म्हणत नाही. असे म्हणणे हा तर वेडेपणा आहे, मूर्खता आहे. जगातील लोक भलेही म्हणतील पण आम्ही असे म्हणत नाही की आम्ही भगवान आहोत. आम्ही हे स्पष्ट सांगतो, 'मी तर ज्ञानी पुरुष आहे, आणि तीनशे छपन्न डिग्रीवर आहे.' अर्थात चार डिग्रीचा फरक आहे. दादा भगवानांची गोष्ट वेगळी आहे. आणि व्यवहारात मी स्वतःला ए.एम.पटेल आहे असे म्हणतो.

आता या वेगळेपणाची गोष्ट लोकांना जास्त समजत नाही. 'दादा भगवान' तर आत प्रकट झाले आहेत. म्हणून जे हवे ते काम साधून घ्या. असे अगदी स्पष्टपणे सांगतो. क्वचितच असे 'चौदालोक'चे नाथ प्रकट होतात. हे मी स्वतः पाहून सांगतो, म्हणून आपले (मोक्षाचे) काम पार पाडून घ्या.

## हे नमस्कार तर त्वरितच पोहोचतात

हे सर्व लोक सकाळी झोपेतून उठून नमस्कार करतील तर गर्दीच

होईल ना? आणि संध्याकाळी तर खूपच गर्दी असते. म्हणून पहाटे साडेचार ते साडेसहा, हा ब्रह्ममुहूर्त म्हटला जातो, सर्वात उच्च प्रकारचा मुहूर्त. या वेळेत ज्यांनी ज्ञानींचे स्मरण केले, तीर्थंकरांचे स्मरण केले, शासन देवदेवींचे स्मरण केले तर ते त्या सर्वांना लगेच प्रथम स्वीकार होऊन जाते, कारण नंतर रुग्ण वाढू लागतात ना! पहिला रुग्ण आला, मग दुसरा आला, नंतर गर्दी वाढत जाते. सात वाजल्यापासून गर्दी वाढत जाते. मग बारा वाजता पुष्कळ गर्दी वाढते. म्हणून जो पहिले जाऊन उभा राहतो त्याला भगवंतांचे फ्रेश दर्शन होते. 'दादा भगवानांच्या साक्षीने सीमंधर स्वामींना नमस्कार करतो' असे बोलले की लगेच ते तिथे सीमंधर स्वामींपर्यंत पोहोचते. त्यावेळी तिथे काहीच गर्दी नसते. नंतर गर्दीत तर भगवंतसुद्धा काय करतील! म्हणून साडेचार ते साडेसहा हा तर अपूर्व काळ म्हटला जातो. तरुणांनी तर ही वेळ चुकवूच नये.

**प्रश्नकर्ता :** तुम्ही आम्हाला सकाळी सीमंधर स्वामींना चाळीस वेळा नमस्कार करायचे सांगितले आहे, तर त्यावेळी इथे सकाळ असेल आणि तेथील वेळेत काय फरक असेल?

**दादाश्री :** ते आपण पाहायचे नाही. सकाळी सांगण्याचा भावार्थ एवढाच की कामधंद्याला जाण्यापूर्वी नमस्कार केला पाहिजे. आणि जर धंदा नसेल तर वाटेल त्यावेळी दहा वाजता करा, बारा वाजता करा!

## तिथे जाऊ शकतो, पण सदेह नाही

**प्रश्नकर्ता :** सीमंधर स्वामी तर तिथे (महाविदेह क्षेत्रात) आहेत. तुम्ही तिथे रोज दर्शन करण्यासाठी जाता, मग ते कसे? ते आम्हाला समजवा.

**दादाश्री :** आम्ही जातो, परंतु आम्ही दररोज दर्शन करण्यास जाऊ शकत नाही. आम्हा ज्ञानी पुरुषांच्या इथून (खांद्यावरून) एक प्रकाश निघतो आणि जिथे तीर्थंकर आहेत तिथे जाऊन प्रश्नांचे समाधान मिळवून मग परत येतो. जेव्हा कधी समजुतीमध्ये काही

फरक पडतो, समजण्यात काही चूक होत असेल, तेव्हा विचारून येतो. बाकी, आम्ही देहासोबत येऊ-जाऊ शकत नाही, महाविदेह क्षेत्र असे नाही.

आमची सीमंधर स्वामींशी तार जुळलेली आहे. आम्ही तिथे सर्व प्रश्न विचारतो आणि त्या सर्वांची उत्तरे आम्हाला मिळतात. आत्तापर्यंत आम्हाला लाखो प्रश्न विचारले गेले आहेत आणि आम्ही त्या सर्वांची उत्तरे दिलेली आहेत, पण ती सर्व स्वतंत्र रूपाने नाही. सर्व उत्तरे आम्हाला तिथून मिळाली होती. सगळीच उत्तरे देऊ शकत नाही ना! उत्तर देणे ही काय सोपी गोष्ट आहे? कुठलीही व्यक्ती स्वत: पाच उत्तरेसुद्धा देऊ शकत नाही! पण ही तर एक्जॅक्ट उत्तरे येतात. म्हणूनच सीमंधर स्वामींची भक्ती करतात ना!

## या काळात कोणी भावी तीर्थंकर होऊच शकत नाही

**प्रश्नकर्ता :** आता दादांचे ज्ञान घेतलेले जे महात्मा आहेत, अंदाजे पन्नास हजार असतील. जेवढेही आहेत, त्यात थोडे जवळचे असतील, थोडे दूरचे असतील तर त्यातील किती महात्मा तीर्थंकर होतील?

**दादाश्री :** तीर्थंकर, यात तीर्थंकराचे माहीत नाही. तीर्थंकर नाही, पण सर्व केवली होतील. केवलज्ञानी होऊन सर्व मोक्षाला जातील.

**प्रश्नकर्ता :** पण तीर्थंकर का होणार नाही?

**दादाश्री :** तीर्थंकर नाही. ते गोत्र खूप उच्च गोत्र असते, ते गोत्र केव्हा बांधले असावे की जेव्हा चौथ्या *आऱ्यात* किंवा तिसऱ्या *आऱ्यात* तीर्थंकर प्रत्यक्ष हजर असतात तेव्हा बांधले गेले असेल तर चालते. आता या काळात नवीन गोत्र बांधू शकत नाही. आणि जुने बांधलेले असेल तर आम्हाला ते समजते. तीर्थंकर होण्यात काही विशेष फायदा नाही. आपल्याला तर मोक्षाला जाण्यातच फायदा आहे. तीर्थंकरांनासुद्धा मोक्षाला जायचे आहे ना!

**प्रश्नकर्ता :** किती वर्षात आपले गोत्र बदलते? गोत्र कशा प्रकारे बदलते?

**दादाश्री :** ते तर जेव्हा चांगला काळ असतो आणि तीर्थंकर स्वत: हजर असतात तेव्हाच तीर्थंकर गोत्र बांधले जाते.

**प्रश्नकर्ता :** पण दादाजी आता कलियुगानंतर सत्‌युगच येणार आहे ना, म्हणजे चांगलाच काळ येणार आहे ना!

**दादाश्री :** नाही, पण जेव्हा तीर्थंकर असतील तेव्हा ना? तीर्थंकर येण्यापूर्वीच आपल्यातील बरेच महात्मा मोक्षाला निघून जातील!

**प्रश्नकर्ता :** मला वारंवार असे वाटते की, आम्ही तीर्थंकर का नाही होऊ शकत? आम्ही सरळ मोक्षालाच जाऊ? पण मग तुमच्याकडून ऐकायला मिळाले की तीर्थंकर गोत्र बांधलेले असेल तरच तीर्थंकर होता येते. तर आता आम्ही ते गोत्र कसे बांधू शकतो?

**दादाश्री :** अजूनही तुला लाख वर्षांपर्यंत जन्म घ्यायचे असतील तर बांधू शकशील. तर पुन्हा बांधून देतो आणि मग सातव्या नरकात खूप वेळा जावे लागेल. अनेकदा नरकात गेल्यानंतर असे उच्च पद मिळते.

**प्रश्नकर्ता :** पण असे उच्च पद प्राप्त होत असेल, तर नरकात जाण्यात काय हरकत आहे?

**दादाश्री :** राहू दे, तुझी हुशारी राहू दे, गप्प बस! शहाणा हो जरा. थोडे जरी तप करण्याची वेळ येईल ना तेव्हा समजेल! आणि तिथे तर कितीतरी तपे करावी लागतील. मी नरकाविषयी थोडे जरी सांगितले तर ते ऐकताच मनुष्य मरून जाईल, इतके दु:ख आहे तिथे. आत्ताचे लोक तर ऐकताच मरून जातील! की 'अरेरे... ओहोहो, मी मेलो.' प्राण निघून जातील. म्हणून असे बोलू नकोस, नाही तर *नियाणां* (स्वत:चे सर्व पुण्य लावून एखाद्या गोष्टीची कामना करणे) होईल.

## चुकूनही त्यांना परोक्ष मानू नका

इतर ठिकाणी सीमंधर स्वामींच्या मूर्त्या स्थापलेल्या आहेत. पुष्कळ ठिकाणी स्थापलेल्या आहेत, पण या महेसाणाच्या मंदिरासारखी मूर्ती असली पाहिजे. तर या देशाचे कल्याण होईल.

**प्रश्नकर्ता :** ते कल्याण कसे होईल?

**दादाश्री :** सीमंधर स्वामी जे तीर्थंकर आहेत, जे वर्तमान तीर्थंकर आहेत त्यांची मूर्ती रूपाने भक्ती करा. समजा, आता महावीर हजर असते, किंवा आपण महावीरांच्या काळी हजर असतो आणि अशी परिस्थिती असती की ते या बाजूला विहार करून येऊ शकत नाहीत आणि आपण त्यांच्याजवळ जाऊ शकत नाही, अशा वेळी आपण इथे 'महावीर, महावीर' असे नाम स्मरण केले तर आपल्याला प्रत्यक्षासारखाच लाभ मिळाला असता ना? मिळाला असता की नाही?

**प्रश्नकर्ता :** हो.

**दादाश्री :** वर्तमान तीर्थंकर म्हणजे, वर्तमान तीर्थंकरांचे परमाणू ब्रह्मांडात फिरत असतात. वर्तमान तीर्थंकरांचा खूपच लाभ होतो.

**प्रश्नकर्ता :** मी घरी बसून सीमंधर स्वामींचे स्मरण केले आणि मंदिरात जाऊन स्मरण केले, यात काही फरक पडेल?

**दादाश्री :** हो, फरक पडतो.

**प्रश्नकर्ता :** कारण मंदिरात मूर्तींची प्रतिष्ठा केलेली आहे, प्राणप्रतिष्ठा केलेली आहे म्हणून?

**दादाश्री :** प्रतिष्ठा केलेली आहे आणि विशेष म्हणजे तिथे देवलोकांचे खूप रक्षणसुद्धा असते! म्हणजे तिथे तसे वातावरण असते, त्यामुळे तिथे प्रचंड प्रभाव पडतो ना? जसे तुम्ही दादांचे नाव मनात घेतले आणि इथे येऊन घेतले, त्यात तर खूप फरक पडतो ना?

**प्रश्नकर्ता :** दादाजी, तुम्ही तर जिवंत आहात.

**दादाश्री :** तसेच तेसुद्धा जिवंत आहेत. जितके जिवंत हे दादाजी आहेत. तितकेच जिवंत तेसुद्धा आहेत. अज्ञानी लोकांसाठी हे दादाश्री जिवंत आहेत, आणि ज्ञानींना तर तेही तितकेच जिवंत आहेत कारण त्यात जो भाग दृश्यस्वरूप आहे, तो सर्व भाग मूर्तीच आहे. मूर्तीशिवाय दुसरे काहीच नाही. पाच इंद्रियगम्य आहे, त्यात अमूर्त नाममात्रही नाही. सर्व मूर्तच आहे आणि या मूर्तीत फरक नाही, डिफरन्स नाही.

**प्रश्नकर्ता :** पण इथे अमूर्त आहे आणि तिथे मूर्तीत अमूर्त नाही, असे मानतात ना?

**दादाश्री :** तिथे अमूर्त नाही पण तिथे मूर्तीत त्यांची प्राणपतिष्ठा केलेली असते. म्हणजे प्रतिष्ठेप्रमाणे बळ! यांची तर गोष्टच निराळी आहे ना? प्रत्यक्ष-प्रकट भगवंतांची गोष्टच वेगळी ना! प्रकट नसते तर कशाचे काय होऊन जाईल!

**प्रश्नकर्ता :** आणि प्रकट तर नसतातच, खूप काळापर्यंत.

**दादाश्री :** आणि ते नसतील तर भूतकाळातील तीर्थंकर, आपले चोवीस तीर्थंकर तर आहेतच ना!

## वर्तमान तीर्थंकरच हितकारी

**प्रश्नकर्ता :** दादाजी, ही मंदिरे वगैरे बांधली जातात पण खरे तर आत्म्याचाच भाव करायचा आहे ना? मंदिरे वगैरेंचे काय काम आहे? खरे तर आपल्याला आत्म्याचाच मार्ग शोधायचा आहे ना?

**दादाश्री :** मंदिरे तर अवश्य बांधली पाहिजेत. जे गेले त्यांचे मंदिर बांधणे यात काय अर्थ आहे? सीमंधर स्वामी हजर आहेत, म्हणून त्यांचे दर्शन केल्याने कल्याण होईल, ते प्रत्यक्ष आहेत, म्हणून

कल्याण होईल. असे काही असेल तर लोकांचे कल्याण होईल, निमित्त पाहिजे. म्हणजे सीमंधर स्वामींचा संकेत अवश्य फळ देणारे आहे. ज्या लोकांनी ज्ञान घेतले नसेल पण मंदिरात जाऊन फक्त सीमंधर स्वामींचे दर्शन जरी घेतले तरी पण त्यांना लाभ होईल. म्हणून हे मंदिर उभारले जात आहे, नाही तर आपल्या येथे असे काही केले जाते का? आपल्याला हे शोभत नाही. आणि हे तर जिवंत तीर्थंकर आहेत, म्हणूनच त्यांच्याबद्दल बोलत आहोत. इतर भूतकाळातील तीर्थंकरांची गोष्ट करण्यात काहीच अर्थ नाही. हवी तेवढी अन्य मंदिरे आहेतच. आणि त्यांचीही गरज आहे. आम्ही त्यासाठी मनाई करत नाही, कारण ती मूर्तीपूजा आहे आणि भूतकाळातील तीर्थंकरांची आहे.

## ही इच्छा आहे 'आमची'

जगातील मतभेद कमी करायचे आहेत. जेव्हा मतभेद दूर होतील, तेव्हाच ही गोष्ट खऱ्या अर्थाने समजेल. हे मतभेद तर एवढे केलेले आहेत की ही शैवांची एकादशी आणि ही वैष्णवांची एकादशी. एकादशीसुद्धा वेगवेगळ्या केल्या आहेत. म्हणून मी मंत्रांना एकत्र करून टाकले आणि मंदिरे वेगळीवेगळी ठेवली. कारण ही एक प्रकारची बिलिफ (मान्यता) आहे. पण हे जे मंत्र आहेत ते एकत्र राहू द्या. कारण मन सदैव शांत झाले पाहिजे ना? या लोकांनी हे सगळे मंत्र वाटून टाकले होते. मी या सगळ्यांना एकत्रित करून अशी प्रतिष्ठा करीन की लोकांचे सर्व मतभेद हळूहळू मिटतील. ही इच्छा आहे आमची, दुसरी कोणतीच इच्छा नाही.

हिंदुस्तानाची ही अशी स्थिती राहायला नको. जैन या स्थितीत राहायला नकोत. सीमंधर स्वामींचे मंदिर हे मूर्तीचे मंदिर नाही! हे तर अमूर्ताचे मंदिर आहे!

## आरती सीमंधर स्वामींची

सध्या वर्तमानात जे भगवंत बह्मांडात हजर आहेत, त्यांची हे लोक आरती करतात, ते दादा भगवान थ्रू करतात आणि मी ती आरती त्यांच्यापर्यंत पोहोचवतो. मी सुद्धा त्यांची आरती करतो. दीड लाख वर्षांपासून भगवंत हजर आहेत, त्यांच्यापर्यंत मी पोहोचवतो.

आरतीत सर्व देवी-देवता हजर असतात. ज्ञानी पुरुषांची आरती थेट सीमंधर स्वामींपर्यंत पोहोचते. सर्व देवी-देवता काय म्हणतात की, जिथे परमहंसांची सभा असते तिथे आम्ही हजर असतो. आपली ही आरती कोणत्याही मंदिरात म्हणा तिथे भगवंतांना हजर रहावे लागेल.

## अनन्य भक्ती, तिथे दिले जाऊ शकते

आपल्याला मोक्षाला जायचे आहे म्हणून महाविदेह क्षेत्रात जाण्यापुरते पुण्य पाहिजे. येथे तुम्ही सीमंधर स्वामींसाठी जेवढे कराल त्यात तुमचे सर्व आले. आणि एवढे केले तरी खूप झाले. यात असे नाही की हे कमी आहे. तुम्ही मनात ठरवले असेल (दान देण्यासाठी) तसे करा, म्हणजे झाले. याहून अधिक करण्याची गरज नाही. मग तुम्ही हॉस्पिटल बनवा किंवा इतर काही करा. ते सर्व वेगळ्या मार्गी जाते. तेसुद्धा पुण्यच आहे पण ते संसारातच ठेवते आणि हे तर पुण्यानुबंधी पुण्य, जे मोक्षाला जाण्यास मदत करते.

अनंत जन्मांची नुकसान भरपाई करायची आहे आणि ती सुद्धा एकाच जन्मात पूर्ण करायची आहे. म्हणून खऱ्या अर्थाने तर पूर्णपणे माझ्या मागेच लागले पाहिजे, पण तुमची तेवढी क्षमता नाही. मी म्हणून सीमंधर स्वामींसोबत तुमची तार (अनुसंधान) जोडून देतो, कारण तिथे जायचे आहे. इथून सरळ मोक्ष होणार नाही. आणखी एक जन्म बाकी राहील. त्यांच्या जवळ बसायचे आहे म्हणून अनुसंधान करून देतो आणि हे भगवंत संपूर्ण विश्वाचे कल्याण करतील.

## जो नाव घेईल त्याची दु:खे जातील

**प्रश्नकर्ता :** सीमंधर स्वामींचे मंदिर उभारण्यामागे तुमचा हा हेतू आहे की (त्यांची भक्ती करून) मग सर्व जण त्या प्रकारे पुढे जाऊ शकतील?

**दादाश्री :** सीमंधर स्वामींचे नाव घेतील तेव्हापासूनच आत परिवर्तन होऊ लागेल.

**प्रश्नकर्ता :** सद्‌गुरूशिवाय तर पोहोचू शकत नाही ना?

**दादाश्री :** सद्‌गुरू तर मोक्षाला जाण्याचे साधन असतात. पण या लोकांना जी दु:खे आहेत ती सर्व दूर होतील, पुण्याच्या उदयात परिवर्तन होत राहील. म्हणून मग या बिचाऱ्यांना दु:ख राहणार नाही. हे सर्व केवढ्या दु:खात आहेत. प्रत्यक्ष सद्‌गुरू भेटले आणि त्यांच्याकडून आत्मज्ञान प्राप्त झाले तर मोक्ष होईल. आणि जर नाही भेटले तर बिचारा पुण्य तरी भोगेल. चांगले कर्म तरी बांधेल.

## दर्शन करण्याची योग्य रीत

भगवंतांच्या मंदिरात किंवा जिनालयात जाऊन योग्य पद्धतीने दर्शन करण्याची इच्छा असेल तर मी तुम्हाला दर्शन करण्याची योग्य पद्धत शिकवतो. बोला, आहे का कुणाची इच्छा?

**प्रश्नकर्ता :** हो, आहे शिकवा दादाजी. उद्यापासूनच त्याप्रमाणे दर्शन करण्यास जाऊ.

**दादाश्री :** भगवंताच्या मंदिरात जाऊन म्हणावे की, 'हे वीतराग भगवंत! तुम्ही माझ्या आतच बसलेले आहात, पण मला याची ओळख झालेली नाही. म्हणून मी आपले दर्शन करीत आहे. मला हे 'ज्ञानीपुरुष' दादा भगवानांनी शिकवले आहे, म्हणून मी याप्रमाणे आपले दर्शन करीत आहे. तर मला माझी स्वत:ची ओळख होईल, अशी आपण कृपा करा.'

जिथे जाल तिथे अशा प्रकारे दर्शन करा. तशी तर वेगवेगळी नावे दिली गेली आहेत. 'रिलेटिव्हली' वेगवेगळे आहेत, 'रियली' सर्व भगवंत एकच आहेत.

## बस, एकालाच

आपल्याला तर फक्त एक तीर्थंकर खुश झाले, म्हणजे खूप झाले! एका घरी जाण्याची जागा भेटली तरीही खूप झाले! सगळ्या घरी कुठे फिरत बसायचे? आणि एकाला पोहोचले म्हणजे सगळ्यांना पोहोचले. उलट जे सगळ्यांना पोहोचवायला गेले ते राहून गेले! आपल्यासाठी एकच चांगले, सीमंधर स्वामी! म्हणजे ते सगळ्यांनाच पोहोचते.

म्हणून सीमंधर स्वामींचे नित्य ध्यान करा. 'प्रभू, सदैव आपले अनन्य शरण द्या,' असे मागा.

## प्रतिकृतीने इथेच प्राप्ती

**प्रश्नकर्ता :** पण दादा, सीमंधर स्वामींना असे वाटत असेल ना की हे दादाजी माझे काम करीत आहेत.

**दादाश्री :** असे नाही. पण तुम्ही स्मरण केले तर तुम्हाला त्याचे फळ मिळेल. सिद्ध भगवंतांचे स्मरण केले तर फळ मिळत नाही. हे देहधारी आहेत. तुम्ही एका जन्मात तिथे जाऊ शकाल. तिथे त्यांचा देहाला तुम्ही हाताने स्पर्शसुद्धा करू शकाल.

**प्रश्नकर्ता :** हो, दादाजी. आम्हाला ही संधी मिळेल ना?

**दादाश्री :** सर्व काही मिळेल. का नाही मिळणार? सीमंधर स्वामींच्या नावाचा तर तुम्ही जय जयकार करता. सीमंधर स्वामींना तुम्ही नमस्कार करता, तिथे तर जायचेच आहे आपल्याला. म्हणूनच आपण त्यांना सांगतो की, 'साहेब! तुम्ही भले तिथे बसलेले आहात, आम्ही तुम्हाला पाहू शकत नाही परंतु आम्ही येथे तुमची प्रतिकृती बनवून तुमचे

नित्य दर्शन घेत असतो.' बारा फुटाची मूर्ती स्थापन करून आपण त्यांचे दर्शन करू शकतो, नामस्मरण करतो कारण ही जिवंत भगवंतांची प्रतिकृती आहे म्हणून फार उत्तम आहे. जे गेले त्यांची सही कामी येत नाही, मग त्यांची प्रतिकृती बनवून काय लाभ? पण हे तर कामी येतील. हे तर अरिहंत भगवंत!

**प्रश्नकर्ता :** हे सगळे जेव्हा दादा भगवानांचे कीर्तन करत होते, तेव्हा आपणही काही तरी बोलून कीर्तन करत होतात, ते कोणाचे होते?

**दादाश्री :** मीसुद्धा बोलत होतो ना! मीसुद्धा दादा भगवानांना नमस्कार करतो. दादा भगवानांची तीनशे साठ डिग्री आहे. माझी (ज्ञानी पुरुष ए.एम.पटेलची) तीनशे छपन्न डिग्री आहे. माझी चार डिग्री कमी पडते. म्हणूनच मी प्रथम बोलण्यास सुरुवात केली की ज्यामुळे हे सगळेजण बोलतील. कारण त्यांचीही डिग्री कमी आहे ना.

**प्रश्नकर्ता :** ज्यांना आपण 'दादा भगवान' म्हणतात ते आणि हे 'सीमंधर,' यांच्यात काय संबंध आहे?

**दादाश्री :** ओहोहो! ते तर एकच आहे. पण या सीमंधर स्वामींना दाखविण्याचे कारण हेच आहे की, सध्या मी देहासहित आहे, मलाही तिथे जाण्याची गरज आहे. कारण जोपर्यंत सीमंधर स्वामींचे दर्शन होत नाही तोपर्यंत मुक्त होऊ शकत नाही. एक जन्म बाकी राहील. मुक्ती तर जे स्वतः मुक्त झाले आहेत त्यांच्या दर्शनाने मिळते. तसे तर मीसुद्धा मुक्त झालेलो आहे, परंतु सीमंधर स्वामी संपूर्ण मुक्त आहेत. ते लोकांना आमच्यासारखे सांगत नाही की 'इथे या आणि तिथे या, मी तुम्हाला ज्ञान देईन', अशी खटपट ते करत नाहीत.

## 'सीमंधर स्वामींचा असीम जय जयकार असो' असे बोलू शकतो?

**प्रश्नकर्ता :** 'सीमंधर स्वामींना निश्चयाने नमस्कार करतो' असे

आम्ही बोलतो तर ते निश्चयानेच बोलायचे असते की व्यवहाराने बोलायचे असते?

**दादाश्री :** निश्चयाने. आणि देह तर लहान मोठा असू शकतो देहाशी आपल्याला काही देणेघेणे नाही.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे 'मी सीमंधर स्वामींना निश्चयाने नमस्कार करतो' असे मी बोलतो ते बरोबर आहे ना?

**दादाश्री :** बरोबर आहे. व्यवहाराने म्हणजे देहाने आणि या नमस्कारविधीत ज्या इतर सर्व गोष्टी आहेत, त्या सर्व व्यवहाराने आहेत. येथे फक्त हा एकच नमस्कार निश्चयाने आहे.

**प्रश्नकर्ता :** दादा भगवानांच्या निश्चयाने आहे?

**दादाश्री :** हो. बस, म्हणजे खरे तर इथेच तुम्ही निश्चयाने नमस्कार केला पाहिजे आणि बाकी सर्व भगवंतांना व्यवहाराने नमस्कार करीत आहे असे बोला. आता सीमंधर स्वामींसाठी निश्चयाने बोलाल तर हरकत नाही, ती तर चांगली गोष्ट आहे. पण तिथे जर आम्ही निश्चय लिहीले तर मग सर्व जागी निश्चय लिहावे लागेल.

**प्रश्नकर्ता :** हो, हो, बरोबर आहे.

**दादाश्री :** फक्त या 'दादा भगवानांना'च निश्चयाने केले.

**प्रश्नकर्ता :** जसे 'दादा भगवानांचा असीम जय जयकार असो' हे बोलत असतो तसेच 'सीमंधर स्वामींचा असीम जय जयकार असो' बोलू शकतो का?

**दादाश्री :** खुशाल बोलू शकता. पण 'दादा भगवानांचा जय जयकार बोलताना आत जो आनंद होतो तसा आनंद त्यात होणार नाही. कारण हे प्रत्यक्ष आहेत. आणि ते प्रत्यक्ष तर तुम्ही पाहू शकत नाही,

पण तसे बोलू शकता. सीमंधर स्वामींसाठी जय जयकार वगैरे जे हवे ते बोलू शकता, कारण सीमंधर स्वामी आपले शिरोमान्य भगवंत राहतील. जोपर्यंत आपण मुक्त होत नाही तोपर्यंत शिरोमान्य राहतील. इथे तर आम्ही अंगुलीनिर्देश केला आहे, की असे ज्याला बोलता आले त्याचे कल्याण होईल.

**प्रश्नकर्ता :** हो, अंगुलीनिर्देश आहे. सर्व बरोबर आहे.

**दादाश्री :** हा सर्व अंगुलीनिर्देश आहे. आत्तापर्यंत कोणी अंगुलीनिर्देश केलेला नाही ना, मग काय करावे? इतर सर्व गोष्टी सांगितल्या असतील पण अंगुलीनिर्देश कोणी केला नाही की असे करा म्हणून.

**प्रश्नकर्ता :** हे तर मी त्या दिवशी असे बोललो होतो तेव्हा एका भाऊंनी मला सांगितले की असे बोलू शकत नाही. निश्चयाने बोलू शकत नाही, म्हणून मी विचारले.

**दादाश्री :** नाही. असे बोलले असाल तरी हरकत नाही. त्यामुळे काही पाप लागणार नाही. पण या ज्ञानी पुरुषांनी सांगितल्याप्रमाणे बोलले तर त्यात खूप फरक पडतो. तुम्ही बोललात त्याची जोखीम नाही. त्यासाठी प्रतिक्रमण करावे लागणार नाही. सीमंधर स्वामींचे फक्त नाव जरी घेतले ना, तरीही त्याला फायदा होईल.

## जिथे प्युरिटी, तिथे तयारी

आमचे ध्येय काय आहे? मी तर स्वत:च्या पैशांचे कपडे घालतो. या नीरूबहनसुद्धा त्यांच्या स्वत:च्या पैशांचे कपडे घालतात. कोणाची एक पैसुद्धा घ्यायची नाही आणि जगत् कल्याणासाठी सर्व प्रकारची तयारी आहे. जवळपास पन्नास हजार समकितधारी माझ्याजवळ आहेत आणि त्यात दोनशे ब्रह्मचारी आहेत. ते सर्व जगत् कल्याणासाठी तयार होऊन जातील.

## आज्ञा बनवते 'महाविदेह'साठी लायक

हे ज्ञान घेतल्यानंतर तुमचा हा जन्मच महाविदेह क्षेत्रात जाण्यासाठी लायक होत चालला आहे. मला काही करण्याची गरज नाही. नैसर्गिक नियमच आहे.

**प्रश्नकर्ता :** महाविदेह क्षेत्रात कशा प्रकारे जाऊ शकतो? पुण्याने?

**दादाश्री :** आमच्या या आज्ञा पालन केल्यामुळे या जन्मात पुण्य बांधलेच जात आहे, ते पुण्य महाविदेह क्षेत्रात घेऊन जाते. आज्ञा पाळल्याने धर्मध्यान उत्पन्न होते, ते सर्व फळ देईल. जेवढी आमची आज्ञा पालन करता तेवढे पुण्य बांधले जाते. मग तिथे तीर्थंकरांकडे गेल्यावर त्याचे फळ उपभोगायला मिळेल.

**प्रश्नकर्ता :** सीमंधर स्वामी आम्हा महात्म्यांचे कचऱ्यासारखे (घाणेरडे) आचार पाहून त्यांच्याजवळ ठेवतील का?

**दादाश्री :** त्यावेळी असे आचार राहणार नाहीत. आता जे तुम्ही माझ्या आज्ञेचे पालन करता त्याचे फळ तेव्हा मिळेल. आणि आत्ताचा जो कचरा माल आहे, तो तुम्ही मला विचारल्याशिवायच भरला होता, तो आता निघत आहे.

**प्रश्नकर्ता :** दादाजी, सीमंधर स्वामींचे स्मरण केल्याने सीमंधर स्वामींजवळ जाऊच असे निश्चित होऊ शकते का?

**दादाश्री :** जायचे आहे, हे तर निश्चितच आहे. यात नवीन काही नाही, पण सदैव स्मरण राहिल्याने आत दुसरे नवीन काहीच घुसत नाही. सदैव दादांचे स्मरण करत असाल किंवा तीर्थंकरांचे स्मरण करत असाल तर मग माया घुसणार नाही! आता इथे माया येऊ शकत नाही.

## जबाबदारी कोणाची घेतली?

आमचा सीमंधर स्वामींसोबत संबंध आहे. आम्ही सर्व महात्म्यांच्या मोक्षाची जबाबदारी घेतली आहे. जो आमची आज्ञा पाळेल, त्याची जबाबदारी आम्ही घेतो.

हे ज्ञान प्राप्त केल्यानंतर एक अवतारी होऊन सीमंधर स्वामींजवळ जाल आणि तिथून मग मोक्ष प्राप्त होईल. कोणाचे दोन अवतार (जन्म) पण होतील पण चार अवतारांपेक्षा जास्त तर होणारच नाहीत, जर आमची आज्ञा पाळली तर. येथेच मोक्ष होईल. 'येथे तुम्हाला एक जरी चिंता झाली तरी दावा दाखल करा' असे आम्ही म्हणतो. हे तर वीतराग विज्ञान आहे. चोवीस तीर्थंकरांचे एकत्रित विज्ञान आहे.

## फक्त सीमंधर स्वामीच आमचे एकमेव उपरी

**प्रश्नकर्ता :** आमचे रक्षणकर्ता तर तुम्ही आहात पण तुमचे *उपरी* (वरिष्ठ) कोण आहे? तुमच्याजवळ जो येईल त्याच्याशी तुम्हाला नियमानुसारच वागावे लागते ना?

**दादाश्री :** खूपच नियमपूर्वक! आणि आमचे *उपरी* तर हे जे बसले आहेत ना, सीमंधर स्वामी, तेच आमचे एकमेव *उपरी* आहेत! आम्ही त्यांच्याकडे काहीच मागणी करत नाही. मागणी करूच शकत नाही ना! तुम्ही माझ्याकडे मागणी करू शकता!!

## अहो! ते अद्‌भुत दर्शन!

**प्रश्नकर्ता :** आम्ही तर दादाजींचा व्हिसा दाखवू.

**दादाश्री :** व्हिसा दाखवताच आपोआप काम होईल. तीर्थंकरांना पाहिल्याबरोबरच तुमच्या आनंदाची सीमा राहणार नाही, पाहताक्षणीच आनंद. संपूर्ण जगाची विस्मृती होऊन जाईल! जगातील कुठलेही

खाणे-पिणे आवडणार नाही. त्यावेळी सर्व संसारी मनोकामना समाप्त होतील. निरावलंब आत्मा प्राप्त होईल! नंतर कसलेही अवलंबन राहणार नाही.

## सम्यक् दृष्टी, हाच व्हिसा

**प्रश्नकर्ता :** आपण सांगितले की तीर्थंकरांचे दर्शन केले तर मनुष्याला केवलज्ञान प्राप्त होते.

**दादाश्री :** तीर्थंकरांचे दर्शन तर खूप लोकांनी केलेले होते. आपण सगळ्यांनी सुद्धा दर्शन केले होते, पण त्यावेळी आपली तयारी नव्हती. दृष्टी परिवर्तन झाले नव्हते. मिथ्या दृष्टी होती. मिथ्या दृष्टी असल्यामुळे मग तीर्थंकर सुद्धा काय करतील? ज्यांची सम्यक् दृष्टी असते त्यांच्यावर तीर्थंकरांची कृपा होते.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे ज्याची तयारी असते, त्याला तीर्थंकरांचे दर्शन झाले तर मोक्ष प्राप्त होतो?

**दादाश्री :** म्हणूनच आपल्याला येथे तयार व्हायचे आहे. त्याचे कारण एवढेच की इथून तयार होऊन, व्हिसा घेऊन जा, मग जरी कुठेही गेले तरी तेथे कोणते ना कोणते तीर्थंकर भेटतील.

## सीमंधर स्वामींचीच पूजा

हिंदुस्तानात जर घरोघरी सीमंधर स्वामींचे फोटो असतील तर कामच होऊन जाईल. कारण ते हयात आहेत. आमचा फोटो नसला तरी चालेल पण सीमंधर स्वामींचा फोटो तर ठेवाच. मग जरी लोक त्यांना ओळखत नसतील आणि असेच दर्शन केले तरीही कल्याण होईल. या सीमंधर स्वामींचे फोटो खूप सुंदर काढलेले आहेत आणि ते ठिकठिकाणी पोहोचतील. घरोघरी पोहोचतील तेव्हा कल्याण होईल. ते हजर आहेत, ते रोख फळ देतात!

हे मंदीर यासाठीच बनले आहे की जगातील लोकांनी सीमंधर स्वामींना ओळखावे. सीमंधर स्वामी कोण आहेत, हे जाणावे. घरोघरी सीमंधर स्वामींच्या फोटोची पूजा होईल, आरती होईल आणि ठिकठिकाणी सीमंधर स्वामींची मंदिरे उभारली जातील, तेव्हा जगाचा नकाशा काही निराळाच असेल!!

## मोक्ष स्वरूपींच्या सान्निध्यात

आणि आम्ही इथे दिसतो जरूर पण आम्ही तर सीमंधर स्वामींच्या समोरच बसलेलो असतो आणि तिथे तुम्हाला दर्शन करवितो. त्यांच्याशी आमची ओळख आहे. सीमंधर स्वामी आपल्या दादांचे पण दादा आहेत! अखेर तर आपल्याला जे पाहिजे त्याचीच गरज आहे.

आणि सीमंधर स्वामींजवळ बसून राहिलात ना, त्यांच्या मूर्तीजवळ बसून राहिलात तरीही मदत होईल. मीसुद्धा बसून राहतो ना, मला तर मोक्ष मिळालेला आहे, तरी पण मी बसून राहतो. नाही तर माझे त्यांच्याकडे काय काम आहे? कारण अजून ते माझे *उपरी* (वरिष्ठ) आहेत. त्यांचे दर्शन करू तेव्हाच मोक्ष होईल, अन्यथा मोक्ष होणार नाही. त्यांचे दर्शन करतो म्हणजे कोणाचे दर्शन? मोक्ष स्वरूपाचे दर्शन! देहासहित जे मोक्षस्वरूप आहेत त्यांचे दर्शन!

**-जय सच्चिदानंद**

# वर्तमान तीर्थंकर श्री सीमंधर स्वामींना प्रार्थना

## ( दररोज एकवेळा म्हणायची )

हे निरागी, निर्विकारी, सच्चिदानंद स्वरूप, सहजानंदी, अनंतज्ञानी, अनंतदर्शी, त्रैलोक्य प्रकाशक, प्रत्यक्ष-प्रकट ज्ञानीपुरूष श्री दादा भगवानांच्या साक्षीने आपणास अत्यंत भक्तीपूर्वक नमस्कार करून, आपले अनन्य शरण स्वीकारीत आहे. हे प्रभू ! मला आपल्या चरणकमलापाशी स्थान देऊन अनंतकाळाच्या भयंकर भटकंतीचा अंत आणण्याची कृपा करा, कृपा करा, कृपा करा.

हे विश्ववंद्य असे प्रकट परमात्म स्वरूप प्रभू! आपले स्वरूप तेच माझे स्वरूप आहे. परंतु अज्ञानतेमुळे मला माझे परमात्म स्वरूप समजत नाही. म्हणून आपल्या स्वरूपातच मी माझ्या स्वरूपाचे निरंतर दर्शन करू अशी मला परम शक्ती द्या, शक्ती द्या, शक्ती द्या.

हे परमतारक देवाधिदेव, संसाररूपी नाटकाच्या आरंभ काळापासून आजच्या दिवसाच्या अद्यक्षणापर्यंत कोणत्याही देहधारी जीवात्म्याच्या मन-वचन-काया, यांच्या प्रति जे अनंत दोष केले आहेत, त्या प्रत्येक दोषाला पाहून, त्याचे प्रतिक्रमण करण्याची मला शक्ती द्या. त्या सर्व दोषांची मी आपल्यापाशी क्षमायाचना करीत आहे. आलोचना, प्रतिक्रमण, प्रत्याख्यान करीत आहे. हे प्रभू! मला क्षमा करा, क्षमा करा, क्षमा करा आणि माझ्याकडून पुन्हा असे दोष कधीही होऊ नयेत असा दृढ निर्धार करीत आहे. त्यासाठी मला जागृती द्या, परम शक्ती द्या, परम शक्ती द्या, परम शक्ती द्या.

आपल्या प्रत्येक पावन पदचिन्हांवर तीर्थाची स्थापना करणारे हे तीर्थंकर श्री सीमंधर स्वामी प्रभू! जगातील सर्व जीवांप्रति संपूर्ण अविराधक भाव आणि सर्व समकिती जीवांप्रति संपूर्ण आराधक भाव माझ्या हृदयात सदा संस्थापित राहोत, संस्थापित राहोत,

संस्थापित राहोत! भूत, भविष्य आणि वर्तमान काळातील सर्व क्षेत्रांतील सर्व ज्ञानी भगवंतांना माझा नमस्कार असो, नमस्कार असो, नमस्कार असो! हे प्रभू! आपण माझ्यावर अशी कृपा करा की ज्यामुळे मला ह्या भरतक्षेत्रातील आपल्या प्रतिनिधी स्वरूप कोणा ज्ञानी पुरूषाचा, सत् पुरूषाचा सत् समागम होवो आणि त्यांचा कृपाधिकारी बनून आपल्या चरणकमलापर्यंत पोहोचण्याची पात्रता मी प्राप्त करू.

हे शासन देवी-देवतांनो! हे पांचांगुली यक्षिणीदेवी, तथा हे चांद्रायण यक्षदेव! हे श्री पद्मावती देवी! मला श्री सीमंधर स्वामींच्या चरणकमलापाशी स्थान मिळविण्याच्या मार्गात कोणतेही विघ्न न येवो, असे अभूतपूर्व रक्षण प्रदान करण्याची कृपा करा आणि केवलज्ञान स्वरूपातच राहण्याची परम शक्ती द्या, परम शक्ती द्या, परम शक्ती द्या!

❖❖❖❖❖

# श्री सीमंधर स्वामींची आरती

जय 'सीमंधर स्वामी, प्रभु तीर्थंकर वर्तमान,
महाविदेह क्षेत्रे विचरता, ( २ ) भरत ॠणानुबंध. जय...

'दादा भगवान' साक्षीए, पहोंचाडुं नमस्कार ( २ ) ...( स्वामी )
प्रत्यक्ष फळ पामुं हुं, ( २ ) माध्यम ज्ञान अवतार. जय...

पहेली आरती स्वामीनी, ॐ परमेष्टि पामे ( २ ) ...( स्वामी )
उदासीन वृत्ती वहे, ( २ ) कारण मोक्ष सेवे. जय...

बीजी आरती स्वामीनी, पंच परमेष्टि पामे ( २ ) ...( स्वामी )
परमहंस पद पामी, ( २ ) ज्ञान-अज्ञान लणे. जय...

त्रीजी आरती स्वामीनी, गणधर पद पामे ( २ ) ...( स्वामी )
निराश्रित बंधन छूटे, ( २ ) आश्रित ज्ञानी थये. जय...

चोथी आरती स्वामीनी, तीर्थंकर भावि ( २ ) ...( स्वामी )
स्वामी सत्ता 'दादा' कने, ( २ ) भरत कल्याण करे. जय...

पंचमी आरती स्वामीनी, केवळ मोक्ष लहे ( २ ) ...( स्वामी )
परम ज्योति भगवंत 'हुं', ( २ ) अयोगी सिद्धपदे. जय...

एक समय स्वामी खोळे जे, माथुं ढाळी नमशे ( २ )...( स्वामी )
अनन्य शरणुं स्वीकारी, ( २ ) मुक्तिपदने वरे. जय...

❖❖❖❖❖

# संपर्क सूत्र

## दादा भगवान परिवार


**अडालज** : **त्रिमंदिर**, सीमंधर सिटी, अहमदाबाद-कलोल हाईवे,
पोस्ट : अडालज, जि.-गांधीनगर, गुजरात - 382421
**फोन :** 9328661166, 9328661177
E-mail : info@dadabhagwan.org

**मुंबई** : **त्रिमंदिर,** ऋषिवन, काजुपाडा, बोरिवली (E)
फोन : 9323528901

| | | | |
|---|---|---|---|
| **दिल्ली** | 9810098564 | **बेंगलूर** | 9590979099 |
| **कोलकता** | 9830080820 | **हैदराबाद** | 9885058771 |
| **चेन्नई** | 7200740000 | **पूणे** | 7218473468 |
| **जयपुर** | 8890357990 | **जलंधर** | 9814063043 |
| **भोपाल** | 6354602399 | **चंडीगढ** | 9780732237 |
| **इन्दौर** | 6354602400 | **कानपुर** | 9452525981 |
| **रायपुर** | 9329644433 | **सांगली** | 9423870798 |
| **पटना** | 7352723132 | **भुवनेश्वर** | 8763073111 |
| **अमरावती** | 9422915064 | **वाराणसी** | 9795228541 |

**U.S.A.** : **DBVI Tel. :** +1 877-505-DADA (3232),
**Email :** info@us.dadabhagwan.org

**U.K.** : +44 330-111-DADA (3232)

**Kenya** : +254 722 722 063

**UAE** : +971 557316937

**Dubai** : +971 501364530

**Australia** : +61 421127947

**New Zealand** : +64 21 0376434

**Singapore** : +65 81129229

**www.dadabhagwan.org**



## सीमंधर स्वामी

घरोघरी सीमंधर स्वामींची पूजा आणि आरती होईल आणि ठिकठिकाणी सीमंधर स्वामींची मंदिरे उभारली जातील, तेव्हा दुनियेचा नकाशा काही वेगळाच असेल.

-दादाश्री

dadabhagwan.org

ISBN 978-93-86321-06-0

9 789386 321060

Printed in India

Price ₹ 10